


# जातक कथा

## भाग ४

धर्मानंद कोसंबी



# जातककथा

(पुस्तक चौथे)

धर्मानंद कोसंबी

ई साहित्य प्रतिष्ठान

# जातककथा पुस्तक चौथे


लेखक : धर्मानंद कोसंबी



प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

मुद्रित शोधन : नीता आंबेगावकर (नागपूर)

neetaa26@gmail.com

मुखपृष्ठ : कनक वाईकर (परभणी)

kanak.waikar@gmail.com

Ph : 8888899126

आभार : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान


http://dharmanandkosambi.com/index.php?option=com_content&view=section&layout=blog&id=10&Itemid=143


या पुस्तकातील चित्रे जगभरातील विविध देशांतील जातक चित्रकथांतून गुगलवरून घेतली आहेत.


हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून याचा मूळ रुपात विनामूल्य प्रसार केला जाऊ शकतो. या पुर्वीचे भाग www.esahity.com येथे उपलब्ध आहेत.

या पुढील भागांसाठी esahity@gmail.com वर संपर्क साधा.

# धर्मानंद कोसंबी



महाराष्ट्राने जगाला अनेक विद्वान रत्ने दिली. अशांपैकी एक म्हणजे धर्मानंद कोसंबी. त्यांचा जन्म गोव्यामध्ये १८७६ साली झाला. लहानपणी त्यांना मराठी सोडून इतर कोणतीच भाषा येत नसे. परंतू शिक्षणासाठी त्यांनी घर सोडले आणि आधी पुणे, आणि नंतर उज्जैन, इंदौर, ग्वाल्हेर, प्रयाग, वाराणसी येथे त्यांनी संस्कृत व इंग्रजीचा अभ्यास केला. गृहस्थिती गरिबीची होती. बाहेर पडले तेव्हा प्रवासाच्या खर्चाला कमरेला पैसा नव्हता. टक्केटोणपे खात गुरूच्या शोधात हजारो मैल सापडेल त्या वाहनाने वा पायी प्रवास केला. बहुतेक पायी प्रवास अनवाणीच केला. अनेक वेळा पाय रक्तबंबाळ झाले, पुष्कळ वेळा चण्या-चुरमुऱ्यावरच भूक भागवावी लागली; वा उपाशीच राहावे लागले. पण त्यांनी अभ्यास सोडला नाही. त्यानंतर पाली व अर्धमागधी भाषांचा अभ्यास करत ते नेपाळ, श्रीलंका, ब्रह्मदेश आदी देशांत फ़िरले. या काळात त्यांनी बौद्ध धर्माचा सखोल अभ्यास केला. गौतम बुद्धाचे पहिले सविस्तर चरित्र त्यांनी संशोधन करून प्रथम मराठी आणि नंतर इतर भाषांत लिहिले.

धर्मानंदांना श्रीलंकेतील बौद्ध मठात बौद्ध विद्येचे गुरु भेटले. तिथे त्यांनी भिक्षुदीक्षा घेतली. तेथे पाली भाषा शिकून बौद्ध धर्माच्या ग्रंथांचे सांगोपांग अध्ययन केले. बौद्ध योगाच्या अभ्यासाकरिता दोनदा ब्रह्मदेशात जाऊन आले. जिवावर अनेक आपत्ती आल्या, परंतु बौद्धधर्माच्या

विद्येचा ध्यास वाढतच गेला. पाली भाषेत ज्याप्रमाणे बौद्धधर्माचे अफाट साहित्य आहे, तसेच संस्कृतमध्येही आहे. त्या दोन्ही भाषेतील साहित्यांमध्ये या सात वर्षांत धर्मयात्रेत पारंगतता मिळविली. वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत चतुरस्त्र विद्वत्ता संपादन केली.

नंतर ते कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक झाले. त्यानंतर काही वर्षे पुण्याच्या फ़र्ग्युसन कॉलेजमध्ये (लो. टिळक, आगरकर, गोखले यांच्या काळात) शिकवल्यानंतर त्यांना इंग्लंडच्या ऑक्सफ़र्ड विद्यापीठातून शिकवण्याची आग्रहाची विनंती करण्यात आली. तिथे ते विद्यार्थ्यांना पाली, संस्कृत, अर्धमागधी भाषा आणि बौद्ध धर्माचा अभ्यास शिकवत असत. इंग्लंडमधीलच नव्हे तर जगातील सर्व देशांच्या विद्वानांकडून त्यांना फ़ार मोठे मानमरातब मिळाले.

पण हे सर्व मानसन्मान सोडून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी ते पुन्हा भारतात आले. इथे ते गुजरात विद्यापीठामध्ये विनापगारी शिकवत असत. मीठाच्या सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना सहा वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. या स्वातंत्र्य लढ्याच्या काळातच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची त्यांच्याशी ओळख झाली आणि बाबासाहेबांच्या जीवनावर कोसंबींचा अमीट असा ठसा उमटला.

डॉ. कोसंबींनी जैन धर्माचाही अभ्यास केला. आपला मृत्यू जैन मुनींप्रमाणे प्रायोपवेशनाने (उपोषणाने) व्हावा अशी त्यांची इच्छा होती. परंतू म. गांधीजींच्या विनंतीने ते दिवसातून एक चमचा काल्याचा रस घेत. त्यांचे निधन १९४७ साली वर्धा येथे म. गांधीजींच्या आश्रमातच झाले.

बौद्ध धर्म दोन हजार वर्षांपेक्षा अधिक कालपर्यंत निम्म्या मानवी जगात प्रचलित होता. त्याला पुन्हा नवा पाया देण्याचे आवश्यक कार्य धर्मानंदांनी केले आहे. बौद्ध धर्माला या विज्ञाननिष्ठ व बुद्धिवादी नव्या युगाच्या प्रेरणांना अनुरूप स्वरूप देणे आवश्यक होते. अद्‌भुत पौराणिक कथा, कल्पित प्रसंग, आणि पारलौकिक तत्त्वज्ञान यांची शेकडो पुटे मूळच्या विवेकवादी शुद्ध बौद्ध धर्मावर आणि बुद्धचरित्रावर शतकानुशतके चढलेली होती, त्यामुळे नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असे त्याचे स्वरूप राहिलेले नव्हते. परंतु बुद्धचरित्राचे व बौद्ध धर्माचे मूळचे शुद्ध स्वरूप या

नव्या युगाच्या प्रेरणांशी सुसंगत असेच आहे, असे ध्यानात आल्यामुळे अनेक आधुनिक पश्चिमी पंडितांनी व विशेषत: धर्मानंदांनी ते स्वरूप यशस्वी रीतीने विवेकबुद्धीने शोधून काढले.

बुद्ध व बौद्ध धर्म ही जागतिक संस्कृतीला मिळालेली अलौकिक सर्वोत्तम देणगी असून ही भारताच्या प्राचीन इतिहासातील एक महान घटना आहे. मानवी संस्कृती शुद्ध नैतिक तत्त्वावर आधारलेली निर्माण करणे, हे आधुनिक मानवाचे परमपवित्र कर्तव्य आहे. हे कर्तव्य बजावण्यात मानवाला अपयश आल्यास विज्ञानाच्या सामर्थ्यावर आधारलेल्या भौतिक संस्कृतीसह मानवजात संपण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे. म्हणून या जगाला तारण्याकरिता बुद्ध व बौद्ध धर्म यांची गरज आहे याची जाणीव त्यांनी जगाला करून दिली.

आचार्य धर्मानंदांनी बुद्धचरित्र व बौद्धधर्म यांचा वाङ्मयीन पाया घातला, त्या पायावर इमारत उभारायचे कार्य थोर दलित नेते डॉ. बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केले. त्यांच्या कार्यास धर्मानंदांचा आधार मिळाला. धर्मानंदांनी लिहून प्रसिद्ध केलेले साहित्य हाच तो आधार होय. विचार हा संस्कृतीचा आधार असतो. धर्मानंदांच्या साहित्यातील विचारांचा गाभा त्रिकालाबाधित व अजरामरही आहे, असे म्हणता येते. डॉ. आंबेडकर यांच्या नव्या आंदोलनाने त्या विचारांना चांगला उजाळा मिळाला. त्या वैचारिक साहित्याच्या पाठीमागे फार मोठा त्याग होता. ज्या उच्च विचारांच्या पाठीमागे महान त्याग असतो, ते विचार अधिक प्रभावीपणे दीर्घकालपर्यंत मोठी प्रेरणा देत राहतात.

धर्मानंद कोसंबी यांनी बहुतेक सर्वच लेखन मोकळया सरळ अस्सल मराठीत केले हे विशेष. जातककथा हे त्यांपैकीच एक. त्यांनी लिहीलेल्या साहित्याचे जगभरातल्या जवळपास सर्वच भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. ई साहित्य प्रतिष्ठान महापंडीत धर्मानंद कोसंबी यांचे हे पुस्तक वाचकांसाठी सादर करीत आहे.

# जातक कथा

जातक कथा म्हणजे जन्माच्या कथा. जन्म कथा.

बौद्ध  धर्मानुसार गौतम बुद्धाने बुद्ध जन्म घेण्यापुर्वी अनेकदा जन्म घेतला आणि स्वतःचे शुद्धीकरण केले. यात कधी हत्ती, कधी वृक्ष, कधी हरीण, वाघ, तर कधी मानवी जन्मात, व्यापारी, राजा, नोकर, सैनिक असे अनेक जन्म घेतले. या कथा खूप मनोरंजक आहेत. पण त्यांचा हेतू केवळ टाईमपास नसून समाजाला सोप्या सरळ पद्धतीने नैतिकतेचे धडे देणे हा होता. या कथा अडिच हजार वर्षांपुर्वी लिहील्या गेल्या. त्यानंतरच्या काळातल्या हितोपदेश, पंचतंत्र किंवा ईसापनिति आदी जगभरातल्या सर्वच गोष्टींवर जातक कथांची छाप जाणवते.

जातककथांच्या द्वारे बौद्ध धर्म जगाच्या अर्ध्या भागावर पोहोचला. कलाकारांना त्यांनि स्फ़ूर्ती दिली. अजिंठ्याच्या भिंतींवर असलेल्या चित्रे जातककथांचीच आहेत. वेरूळची सुमारे एक तृतियांश लेणीदेखील जातक कथांवर आधारित आहेत. जपान, इंडोनेशिया, अफ़गाणिस्तान, ब्रह्मदेश, नेपाळ, मलेशिया. थायलंड, चीन, व्हिएतनाम, लाओस, कांपुचिया अशा असंख्य देशांत हजारो लेणी, स्तुप आणि भित्तीचित्रांतून जातककथांची माहिती मिळते. आंध्र आणि महाराष्ट्र यांच्या सीमारेषेवर जन्मलेल्या या कथांनी संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील सर्व भाषांमध्ये याची भाषांतरे झाली आहेत. किती गर्वाची गोष्ट आहे ना ही?

ई साहित्य प्रतिष्ठान मराठीमध्ये विनामूल्य ई पुस्तकांद्वारे जातककथा वितरित करत आहे. या कथा महान विद्वान धर्मानंद कोसांबी यांनी प्रचंड प्रयत्नांतून संकलित केलेल्या आहेत. या कथांतून आपण आपल्या मुलांवर संस्कार घडवावेत ही अपेक्षा आहे. कृपया या कथा जास्तीत जास्त वाचकांपर्यंत नेण्यासाठी आम्हाला मदत करा.

जातक कथा इंटरनेटवर विनामूल्य उपलब्ध करून देणाऱ्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आम्ही ऋणी आहोत.

टीम ई साहित्य

# जातककथासंग्रह

## पुस्तक चौथे

# नीचाची संगती धरू नये.

(गोधजातक नं. १४१)

एका जन्मी बोधिसत्व घोरपडीच्या कुलात जन्मला होता. त्याच्या मुलाची एका सरड्यावर फार प्रीती जडली. त्यांची मैत्री इतकी दाट झाली  की, ऊठ सूट बोधिसत्वाचा मुलगा सरड्यापाशी जाऊ लागला.

बोधिसत्वाच्या निदर्शनास जेव्हा ही गोष्ट आली तेव्हा तो आपल्या मुलास म्हणाला, " बाबा रे ! सरडा म्हटला म्हणजे हीन जातीचा. त्याच्याशी आपल्या सारख्यांचा संबंध अगदीच शोभत नाही. पण ही गोष्ट बाजूला राहू द्या. अशा नीच प्राण्याशी संगती केली असता त्याचे परिणाम भयंकर होत असतात. तेव्हा आपल्या सर्वांच्या हितासाठी तू त्या हलकटाची संगती सोडून दे. "

परंतु बोधिसत्वाचा मुलगा आज्ञाधारक नव्हता. बापाचा उपदेश न ऐकता त्याने सरड्यावर आपला सर्व विश्वास टाकला; आपल्या बिळाची सर्व माहिती त्याला सांगितली व त्याच्या सहवासात तो फार आनंद मानू लागला. लहान असताना याचे व सरड्याचे आकारमान जवळजवळ सारखेच होते, परंतु दिवसेंदिवस हा सरड्याच्या चौपट, दसपट वाढत गेला. हे पाहून सरडा मनातल्या मनात त्याचा फार मत्सर करू लागला. मी आहे तेवढाच आहे आणि हा मात्र आयत्या पिठावर रेघा मारणाऱ्या श्रीमंत बापाच्या पोराप्रमाणे एकसारखा फुगत चालला आहे.असे वाटून सरड्याचे चित्त झुरणीस लागले. जेव्हा जेव्हा हा घोरपडीचा मुलगा सरड्याला प्रेमालिंगन देत असे तेव्हा तेव्हा सरड्याची सर्व गात्रे तुटून पडण्याच्या बेतात येत असत. त्यावेळी बाह्यात्कारी तर सरडा हासत असे पण मनातल्या मनात  त्याला रडू येई.

एके दिवशी एक पारधी हातात कुदळ घेऊन, पुष्कळ कुत्र्यांसहवर्तमान घोरपडीची शिकार करण्यासाठी त्या जंगलात फिरत होता.त्याला पाहून सरडा म्हणाला, " तुम्ही कुदळ आणि कुत्रे घेऊन कोठे जात आहात? "

पारधी म्हणाला, " घोरपडीची शिकार करण्यासाठी मी या जंगलात आलो आहे. "

सरडा म्हणाला ," तुमचे कुत्रे माझ्या वाटेला जाणार नसतील, तर मी तुम्हाला एक मोठे बीळ दाखवून देतो. तुम्ही पाचोळा गोळा करा आणि गावातून आग घेऊन या. "

पारध्याने सरड्याच्या बोलण्यानुसार पाचोळा गोळा केला. आणि सरड्याने दाखवून दिलेल्या बोधिसत्वाच्या बिळाच्या तोंडावर तो ठेवून आग पेटवली व त्या आगीला वारा घालून घोरपडी गुदमरून जातील असे केले. बिचाऱ्या घोरपडी आपला जीव वाचवण्यासाठी बिळाच्या दुसऱ्या तोंडावाटे बाहेर पडू लागल्या. कित्येकींना पारध्याने ठार मारले तर कित्येकींना कुत्र्यांनी पकडले. मात्र बोधिसत्व आणि त्याचे काही मित्र पारध्याच्या आणि त्याच्या कुत्र्यांच्या तावडीत सापडले नाहीत. सगळया घोरपडी खलास झाल्या असे वाटून पारधी त्याचे कुत्रे आणि मिळालेली शिकार घेऊन घरी गेला. तेव्हा बोधिसत्व बिळाबाहेर येऊन आपल्या मित्रांना म्हणाला , " मित्रहो, आपणयेथे राहणे सुरक्षित नाही. माझ्या मुलाने सरड्याची संगती केली तेव्हाच आपण येथे न राहता दुसरीकडे जावयास पाहिजे होते. कां की कुळातील एक जणाने दुष्टाशी संगती केली म्हणजे त्या सर्व कुळावर संकट ओढवल्यावाचून राहत नाही. "

बोधिसत्व आणि त्याचे मित्र त्या प्रदेशातून दूर जाऊन तेथे राहिले.

# आश्चर्यकारक मरण.

(सिगालजातक नं. १४२)

बोधिसत्व एका जन्मी कोल्ह्याच्या योनीत जन्मला होता. कोल्ह्यांच्या मोठ्या समुदायाचा राजा होऊन तो वाराणसी जवळच्या स्मशानात राहत असे. त्या काळी वाराणसी शहरात एक मोठा उत्सव होत असे. त्या उत्सवात शहरातील लोक मत्स्यमांसादिक भक्षण करून मोठी चैन करीत असत. एके वर्षी या उत्सवात काही धूर्त लोक अशा रितीने मजा मारीत असता पहाटेच्या प्रहरी त्यांच्यासाठी केलेले मांसाचे पदार्थ खलास झाले. दारू मात्र अद्यापि शिल्लक राहिली होती. पुन्हा त्यांनी मांस मागितले तेव्हा एक पळीभरदेखील मांस नाही असे उत्तर त्यांना त्यांच्या नोकराकडून मिळाले. त्यावर एक धूर्त म्हणाला, " मी जिवंत असताना मांस मिळत नाही असे का म्हणता? मी दोन तासांच्या आत मांस घेऊन येतो. तुम्ही येथेच असा." असे म्हणून तो धूर्त एक मोठा दांडा घेऊन गटाराच्या वाटेने शहरातून बाहेर पडला व स्मशानात जाऊन, मेल्याचे सोंग करून उताणा निजला. बोधिसत्वाच्या कळपातील कोल्हे बोधिसत्वाला विचारल्यावाचून कोणतेही साहसाचे कृत्य करीत नसत. त्यांनी त्या माणसाला पाहिल्याबरोबर तो मेला आहे असे जाणून बोधिसत्वाजवळ त्याचे मांस खाण्याची परवानगी मागितली. तेव्हा बोधिसत्व ते प्रेत कशाप्रकारचे आहे हे पाहण्यासाठी त्या ठिकाणी आला. दांडके हातात असलेले प्रेत त्याच्या पाहण्यात आलेले नव्हते. तेव्हा त्याला यात काहीतरी लुच्चेगिरी असावी अशी शंका आली व हळूच जाऊन त्याने ते दांडके दातांनी चावून ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु धूर्ताने दांडके बळकट धरले असल्यामुळे ते त्याला ओढता येईना. तो दूर जाऊन धूर्ताला म्हणाला, "बाबा रे, तुझे हे मरण फारच चमत्कारिक दिसते. तू जर खरोखरीच मेला असतास तर तुझ्या हातातील दांडा सहज ओढून घेता आला असता. आता आम्हाला मारण्याची तुझी युक्ती आमच्या निदर्शनास आल्यामुळे आम्ही तुझ्या तावडीत सापडणार नाही." असे बोलून बोधिसत्वाने आपल्या समुदायासह तेथून पळ काढण्यास सुरुवात केली.

धूर्त उठून त्यांच्या पाठीमागे लागला आणि हातातील दांडा त्याने त्यांच्या अंगावर फेकला परंतु कोणत्याही कोल्ह्याला इजा न होता ते सर्व पळून गेले. धूर्त वाकडे तोंड करीत गटाराच्या मार्गाने पुन्हा शहरात गेला.

## शौर्य स्तुतीवर अवलंबून नसतें.

(विरोचनजातक नं. १४३)

एकदां बोधिसत्त्व सिंहयोनींत जन्मून हिमालयावर रहात असे. एके दिवशीं शिकारीस गेला असतां वाटेंत अकस्मात एक कोल्हा त्याला आढळला. सिंहाला पाहिल्याबरोबर त्या कोल्ह्याची बोबडीच वळली. अंगांत कंप भरला व तेथून हातभर देखील हालण्याचें सामर्थ्य त्याच अंगीं राहिले नाहीं. जात्याच धूर्त असल्यामुळें या संकटांतून पार पडण्याची त्यानें अशी एक युक्ति योजिली कीं, आपलें डोकें सिंहाच्या पायावर ठेऊन तो त्याला म्हणाला, "मृगराज, मीं आपणाला शरण आलों आहे."

सिंह म्हणाला, "तुला माझ्याजवळ काय मागावयाचें आहे ?"

कोल्हा म्हणाला, "मला दुसरें कांहीं नको आहे. केवळ आपल्या चरणाची सेवा करण्यास परवानगी द्या म्हणजे झालें."

सिंह म्हणाला, "हरकत नाहीं, तूं माझ्याजवळ रहा, मीं पकडलेल्या शिकारींतून तुला कांहीं भाग देत जाईन."

कोल्ह्याला तरीं हेंच पाहिजे होतें. तो सिंहाजवळ राहून सुखानें आपला उदरनिर्वाह करूं लागला. कांहीं दिवसांनीं सिंह त्याला म्हणाला, "तूं दुसरें कांहीं एक काम न करतां स्वस्थ बसून असतोस हें ठीक नाहीं. शिकार पकडण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं नाहीं, हें मला कबूल आहे, परंतु या गुहेच्या आसपास एखादा हत्ती, गवा किंवा, गेंडा आला तर त्याची टेहळणी करून मला खबर देत

जा व त्या प्रसंगीं "महाराज, आपला पराक्रम दाखवा" असें मला म्हणत जा म्हणजे मी तात्काळ धावत जाऊन शिकार पकडीन."

या सिंहाच्या हुकूमाप्रमाणें कोल्हा डोंगराच्या पायथ्याशीं शिकार दिसल्याबरोबर गुहेच्या द्वाराशीं येऊन "महाराज, आपल्या तेजाचा प्रकाश पाडा" असें म्हणत असे व सिंह ताबडतोब धावत जाऊन शिकार पकडून आणीत असे. कांहीं काळ गेल्यावर कोल्ह्याची अशी समजूत झाली कीं, सिंह आपल्यापेक्षां फारसा बळकट नसतां केवळ आपल्या स्तुतीच्या जोरावर हत्ती सारख्या मोठ्या प्राण्यावर झडप घालून त्याची शिकार करतो. तो एके दिवशीं सिंहाला म्हणाला, "महाराज, आजपासून आपल्या जिवावर मीं पुष्कळ सुख भोगलें आहे. पण आतां मला यापुढें परपुष्टतेचा कंटाळा आला आहे. "तुम्ही शिकारीची टेहळणी करून मला यापुढें तुझ्या तेजाचा प्रकाश पाड" असें म्हणत जा म्हणजे तुमच्याप्रमाणें गुहेंतून बाहेर पडून मी एकदम शिकार धरून आणीन."

सिंहानें कोल्ह्याची समजून घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तो म्हणाला, "बाबारे, आजपर्यंत हत्तीची शिकार करणारा कोल्हा कोणी पाहिला नाहीं. विनाकारण तूं या भानगडींत पडूं नकोस. मी केलेल्या शिकारीवर निर्वाह करण्याला शरम वाटण्याचें कांहीं कारण नाहीं."

सिंहाचा हा उपदेश न ऐकतां कोल्ह्यानें हत्तीवर स्वारी करण्याचा हट्टच धरला. तेव्हां सिंहानें हत्तीची टेहळणी करण्याचें कबूल केलें, व कोल्हा गुहेंत सिंहासारखा बसून राहिला. डोंगराच्या पायथ्याशीं हत्तीला पाहिल्याबरोबर सिंह गुहेच्या द्वाराशीं येऊन म्हणाला, "जंबुक महाराज, आपल्या तेजाचा प्रकाश पाडा !"

कोल्हा सिंहाप्रमाणें मोठ्या डौलानें गुहेंतून बाहेर पडला व धांवत जाऊन त्यानें हत्तीच्या गंडस्थळावर मोठ्या जोरानें उडी टाकली पण तेथे नखें रोवण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें तो खाली पडला. हत्तीनें पुढला पाय त्याच्या डोक्यावर ठेऊन मेंदू बाहेर काढला आणि तो तेथून निघून गेला. कोल्हा परत आला नाहीं असें पाहून सिंह त्याच्या शोधार्थ गेला व त्याची ही दुर्दशा पाहून म्हणाला, "अरे मूर्खा तूं तुझ्या तेजाचा प्रकाश न पाडतां डोक्यांतून मेंदू मात्र बाहेर पाडलास ! तुझ्यासारखे स्तुतीच्या बळावर पराक्रम करूं पाहणारे प्राणी अशा रीतीनें मरण पावतात !"

# दुर्बल देवता.

(नंगुट्ठजातक नं. १४४)

एके काळी आमचा बोधिसत्व औदिच्य ब्राम्हणकुलात जन्मला होता. त्याच्या जन्म दिवशी त्याच्या आईबापानी जाताग्नी स्थापन केला. पुढे वयात आल्यावर ते त्याला म्हणाले, " जर गृहस्थाश्रम करून राहण्याची तुझी इच्छा असेल तर तीन वेदांचे अध्ययन करून अग्नीहोत्र पालन कर. जर ब्रम्हलोक परायण होण्याची इच्छा असेल तर हा जाताग्नी घेऊन अरण्यात प्रवेश कर व तेथे याची पूजा करून ब्रम्हसायुज्यता मिळव.

बोधिसत्वाला प्रपंचाचा उपद्व्याप नको होता. त्याने जाताग्नी घेऊन अरण्यात प्रवेश केला व तेथे अग्नीदेवतेची पूजा करून तो कालक्रमण करू लागला. एके दिवशी अरण्याजवळच्या गावात भिक्षेला गेला असता, एका श्रद्धाळू मनुष्याने अग्नीपूजेसाठी त्याला एक बैल दिला. तो घेऊन बोधिसत्व आपल्या आश्रमात आला; पुढे त्याच्या मनात असा विचार आला की, भगवान अग्नीनारायणासाठी दिलेली ही दक्षिणा त्यालाच अर्पण करावी. याचा यज्ञ करून अग्नीनारायणाची तृप्ती करावी. पण अग्नीनारायणास मीठ मसाल्यावाचून हे मांस आवडणार नाही. तेव्हा गावातून मीठ वगैरे सर्व पदार्थ आणून मग यज्ञाला सुरुवात करणे इष्ट आहे, असा विचार करून बैलाला अग्नीकुंडासमोर खुंटाला बांधून बोधिसत्व म्हणाला, " भगवान अग्नीनारायण, हा तुमचा बली आहे. उद्या मी याला मारून यथासांग गोमेध करणार आहे. इतर पदार्थ जमविण्यासाठी मी खेड्यात जात आहे. तोपर्यंत तुम्ही या तुमच्या बलीचे रक्षण करा." अशी प्रार्थना करून बोधिसत्व जवळच्या खेड्यात गेला.

इकडे काही व्याध अरण्यात शिकारीसाठी फिरत असता शिकार न सापडल्यामुळे तहानेने व्याकूळ होऊन आणि भुकेने पीडीत होऊन आश्रमातील तपस्व्यापाशी काही फळमुळे खावयास मिळतील या आशेने बोधिसत्वाच्या आश्रमात आले. तेथे त्यांना बैल आणि अग्नीकुंडातील अग्नी या शिवाय दुसरे काही आढळले नाही. त्यांनी बैलाला मारून, त्याचे मांस अग्नीवर भाजून यथेच्छ खाल्ले आणि शेपटी व चामडे तेथेच टाकून देऊन राहिलेले मांस घेऊन ते निघून गेले. बोधिसत्व होमाला लागणारे सर्व पदार्थ घेऊन आश्रमात आला, आणि पाहतो तो बैलाचे शेपूट आणि चामडे एवढेच काय ते शिल्लक राहिलेले. तेव्हा अत्यंत विषाद वाटून तो अग्नीला म्हणाला, " हे अग्नीनारायणा, आजपर्यंत मी तुझी अनन्यभावाने सेवा केली. तू माझे दैवत व मी तुझा भक्त. परंतु तुझ्यासाठी आणिलेल्या बैलाचे जर तुला रक्षण करता आले नाही तर मग तू माझे - तुझ्या भक्ताचे रक्षण कसे करशील? म्हणून आजपासून तुझी सेवा करण्याचे मी सोडून देतो."

बोधिसत्वाने अग्नीनारायणाला जलसमाधी देऊन अरण्यात प्रवेश केला.

# निंबाचा रोप.

(एकपण्णजातक नं. १४९)

दुसऱ्या एका जन्मी बोधिसत्व औदिच्य ब्राम्हणकुलात जन्मला होता. तरूणपणी काही काल गृहस्थाश्रमाचे सुख उपभोगल्यावर प्रपंचाला कंटाळून त्याने हिमालयाची वाट धरली. काही वर्षे हिमालयावर वास केल्यावर खारट आणि आंबट पदार्थ खाण्याच्या उद्देशाने फिरत फिरत तो वाराणसीला आला. रस्त्यातून भिक्षेसाठी फिरत असता त्याची चर्या पाहून वाराणसीचा राजा अत्यंत प्रसन्न झाला आणि नोकरांना म्हणाला. "हा तपस्वी मोठा योगी असावा. त्याला घेऊन राजवाड्यात या. राजाच्या हुकुमाप्रमाणे बोधिसत्वाजवळ जाऊन त्या नोकरांनी त्याला राजवाड्यात येण्याची विनंती केली. तेव्हा तो म्हणाला, " बाबांनो, मी राजकुलात जाणारा तापस नव्हे. राजाची गैरसमजूत झाल्यामुळे त्याने मला बोलाविले असले पाहिजे. मी हिमालयावर राहणारा एक प्रवासी तापस आहे. "

ते वर्तमान त्या नोकरांनी आपल्या धन्यास कळविले. तेव्हा राजा म्हणाला, " माझ्या घरी येणारा असा दुसरा कोणी तपस्वी नाही. ज्या तपस्व्याच्या मागोमाग तुम्ही गेलात त्यालाच मी बोलावतो आहे. मी त्याची चर्या पाहून अत्यंत प्रसन्न झालो आहे असे त्यास सांगा व इथे घेऊन या."

त्याप्रमाणे त्यांनी बोधीसत्वाला मोठ्या आग्रहाने राजवाड्यात नेले. बराच वेळ संवाद झाल्यावर राजा म्हणाला, " भदंत, आपण पुष्कळ वर्षे अरण्यवास केला आहे. आता आपल्या दर्शनाचा आम्हाला सतत लाभ होईल असे करा."

बोधिसत्व म्हणाला, " पण माझ्यासारख्या तपस्व्याला नगरवास आवडणे शक्य नाही. पुष्कळ वर्षे अरण्यात घालविल्यामुळे मला एकांतवासाची आवड लागली आहे. "

राजा म्हणाला, " या नगराच्या आसपास माझी पुष्कळ उद्याने आहेत. त्यापैकी एखाद्या उद्यानात तुम्ही आश्रम बांधून खुशाल राहावे. लोकांकडून कोणत्याही रितीने तुम्हाला उपसर्ग पोचणार नाही आणि तुमच्या शांततेचा भंग होणार नाही, असा मी बंदोबस्त करतो."

राजाचा फारच आग्रह पडल्यामुळे एका रमणीय उद्यानात आश्रम बांधून बोधिसत्व तेथे धर्मचिंतनात काळ घालवू लागला.

वाराणसीच्या राजाला एकुलता एकच मुलगा होता. त्याचे फार लाड करण्यात आल्यामुळे तो अत्यंत द्वाड झाला होता. वडील माणसांचा तो मुळीच मान ठेवीत नसे. नोकराचाकरांना तर शिव्या दिल्यावाचून तो सरळपणे तो कधीही बोलला नाही. या त्याच्या असभ्य वर्तनाने राजा फार कंटाळला. त्याने पुष्कळ गुरू ठेविले; परंतु मुलगा सुधारला नाही. शेवटी उद्यानात राहाणाऱ्या बोधिसत्वाची त्याला आठवण झाली व त्याजपाशी जाऊन तो म्हणाला, " भदंत, माझा मुलगा फार वाचाळ निघाला आहे. ज्याच्या त्याच्या अंगावर पिसाळलेल्या कुत्र्यासारखा तो तुटून पडत असतो. परंतु हे त्याचे वर्तन माझ्या कुळाला अत्यंत लांछनास्पद आहे. आपण काही उपदेश करून माझ्या मुलास ताळयावर आणाल तर मजवर अनंत उपकार होतील. "

बोधिसत्व म्हणाला," महाराज, आम्ही पडलो अरण्यवासी. कधी अध्यापन करण्याचा आमच्यावर प्रसंग येत नाही. तेव्हा आपल्या मुलाला सन्मार्ग दाखविण्याचे काम माझ्या हातून पार पडेल असे मी खातरीने सांगू शकत नाही. तथापि, त्याला एकट्यालाच माझ्या आश्रमात पाठवून दिल्यास शक्य तेवढा प्रयत्न करून पाहीन."

बोधिसत्वाच्या सांगण्याप्रमाणे राजाने आपल्या पुत्राला आश्रमात पाठविले. राजकुमाराचा नोकराचाकरांशी आणि दरबारातील ब्राम्हणांशीच काय तो संबंध होता. ते सर्वजण आपल्या बापाचे नोकर आहेत या विचाराने तो त्यांना वाटेल तसे वागवीत असे. परंतु येथे बोधिसत्वाशी गाठ होती. राजा देखील याच्यासमोर आपले डोके वाकवितो असे राजकुमाराच्या ऐकण्यात आले होते; व त्यामुळे मोठ्या आदराने आश्रमात प्रवेश करून व बोधीसत्वाला नमस्कार

करून तो एका बाजूला बसला. बोधीसत्वाने त्याला हितोपदेश करून पुन्हा दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले. त्याच्या सांगण्याप्रमाणे राजकुमार नियमाने आश्रमात जाऊ लागला.

एके दिवशी बोधिसत्व त्याला बरोबर घेऊन उद्यानात फिरावयास गेला. तेथे एक निंबाचे रोप उगवले होते. त्याकडे बोट दाखवून बोधिसत्व राजकुमाराला म्हणाला , " या झाडाची तुला परीक्षा नाही. तेव्हा याची दोन चार पाने खाऊन पाहा बरे."

राजकुमाराने ताबडतोब त्या रोपाची पाने चावली व तोंड कडू झाल्यामुळे संतापून जाऊन त्याने ते रोप उपटून टाकले. बोधिसत्व म्हणाला, " हे तू काय केलेस?"

राजकुमार म्हणाला, " भदंत, असले हे झाड वाढू देणे योग्य आहे काय? याची दोनतीन पाने चावल्याबरोबर माझे तोंड इतके कडू झाले की, माझ्या सर्व अंगातच जणू कडवटपणा शिरला. तेव्हा अशा झाडाला लहानपणीच उपटून टाकले असता लोकांच्या वेदना कमी करण्याचे श्रेय मला मिळणार नाही काय?"

बोधिसत्व म्हणाला, " हे झाड वृद्धिंगत झाले तर त्याची पाने आणि फळे लोकांनी खाल्लीच पाहिजेत असे नाही; परंतु तू जर तुझ्या कडवट स्वभावासह वृद्धिंगत झालास तर त्याची अत्यंत कडू फळे तुझ्या प्रजेला जबरदस्तीने भोगावी लागणार नाहीत काय? आणि त्यांनी जर तुझे आत्ताच उन्मूलन करून टाकले तर त्यांना दोष देता येईल काय? या गोष्टीचा तू नीट विचार कर आणि आपला स्वभाव गोड करण्याचा प्रयत्न कर. जर तुझा स्वभाव असाच कडू राहिला तर जशी तू या निंबाच्या रोपाची वाट लावलीस तशीच काशीराष्ट्रवासी लोक तुझी वाट लावतील हे पक्के लक्षात ठेव. "

बोधिसत्वाचा हा उपदेश राजकुमाराच्या मनावर इतका बिंबला की, त्याने आपल्या सर्व दुष्ट खोडी सोडून देऊन चांगले गुण संपादन केले.

# मंत्राचा दुरुपयोग.

(संजीवजातक नं. १५०)

एका जन्मी बोधिसत्व मोठा पंडीत होऊन तक्षशिला येथे पुष्कळ शिष्यांना शास्त्र शिकवीत असे. संजीव नावाचा त्याचा एक आवडता शिष्य होता. त्याला बोधिसत्वाने मृत प्राण्याला जिवंत करण्याचा एक मंत्र शिकविला. संजीवाला आपल्या मंत्राचा प्रयोग करून पाहण्याची फार घाई झाली होती. एकदा तो आपल्या सहाध्यायांबरोबर अरण्यात लाकडे गोळा करण्यास गेला असता एक मरून पडलेला वाघ त्याने पाहिला आणि तो म्हणाला, " मित्रहो, गुरूने शिकविलेल्या मंत्राचा उपयोग करून मी या वाघाला जिवंत करतो आणि मेलेल्या प्राण्याला कसे जिवंत करता येते याचे प्रत्यक्ष उदाहरण तुम्हाला दाखवितो."

ते म्हणाले, " मित्रा, जरा दम धर. आम्ही झाडावर चढून बसतो व तेथून तू वाघाला कसे उठवितोस हे पाहतो."

ते झाडावर चढून बसल्यावर संजीवाने मंत्रप्रयोगाला सुरुवात केली. हातात काही खडे घेऊन त्याने मंत्रपठणाला सुरुवात केली. मंत्रपठण चालू असताना तो हातातील खडे वाघाच्या अंगावर फेकू लागला. मंत्रसमाप्ती झाल्याबरोबर वाघ जिवंत झाला आणि मोठ्याने डरकाळी फोडून संजीवाच्या अंगावर धावला. संजीवाला ठार करून तो वाघ त्याचे प्रेत घेऊन दाट झाडीत पळून गेला. संजीवाच्या सहाध्यायांनी घडलेली सर्व गोष्ट बोधिसत्वाला सांगितली. तेव्हा तो म्हणाला, " मुलांनो, मंत्रप्रयोग करण्याची जो घाई करतो, व वेळ, अवेळ न पाहता भलत्याच प्रसंगी आपल्या सामर्थ्याचा उपयोग करतो त्याची गत संजीवाप्रमाणेच होत असते. हे लक्षात ठेवा आणि आपल्या सामर्थ्याचा उपयोग योग्य प्रसंगीच करीत जा. "

## साधुत्वाची महती.

(राजोवादजातक नं. १५१)

एकदा बोधिसत्व वाराणसीराजाच्या, महिषीच्या उदरी जन्माला आला. वहिवाटीप्रमाणे त्याचे नाव ब्रम्हदत्त हेच ठेवण्यात आले. कालांतराने तक्षशिलेला जाऊन तो सर्व विद्यांमध्ये पारंगत झाला; व बापाच्या पश्चात गादीवर बसला. छंद, द्वेष,भय आणि मोह या चार गोष्टींमुळे सत्ताधिकारी लोकांकडून भयंकर अपराध किंवा चुका घडत असतात. परंतु आमचा बोधिसत्व या गोष्टींपासून सर्वथैव परावृत्त झाल्या कारणाने त्याच्या हातून राज्यपद्धतीत कोणतीही चूक झाली नाही. एवढेच नव्हे तर सर्वकाळ आपल्या प्रजेच्या हितात दक्ष असल्यामुळे बोधिसत्वाची कारकीर्द प्रजेला फारच सुखकारक झाली. असे सांगतात की, बोधिसत्व अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचा असल्याकारणाने त्याच्यासमोर खोटा खटला आणण्यास कोणी धजेनासा झाला. न्यायाधीशही लाच लुचपत घेऊन भलताच निवाडा देण्यास धजेनासे झाले. तेव्हा वाराणसीच्या राज्यात न्यायालये ओस पडण्याच्या बेतात आली. न्यायाधीशांनी सर्व दिवस न्यायासनावर येऊन बसावे व खटला आणणारा गृहस्थ न सापडल्यामुळे पुन्हा घरी जावे, असा प्रकार सुरू झाला. दिवसेंदिवस बोधिसत्वाकडे एकदेखील तकरार येईनाशी झाली. तेव्हा तो आपणाशीच म्हणाला, " माझ्या राष्ट्रातून खोटे खटले नष्ट झाले आहेत. सर्वत्र लोक सचोटीने आणि दक्षतेने वागत आहेत. ज्याच्या त्याच्या तोंडून माझी स्तुतीच मला ऐकू येत आहे. पण कदाचित लोक माझ्याजवळ माझेच अवगुण दाखवण्यास घाबरत असतील. मी जर येथून दूरच्या गावी गेलो तर तेथे कदाचित माझे दोष ऐकण्याची संधी मला सापडेल. " असा विचार करून बोधिसत्व अज्ञात वेषाने आपल्या रथातून काशीराष्ट्राच्या सरहद्दीपर्यंत गेला. वाटेत गरीब आणि श्रीमंत प्रजेची त्याने भेट घेतली. त्यांच्याशी तो मोकळ्या मनाने बोलला. हा कोण आहे हे ठाऊक नसल्याने तेही याच्याशी सगळ्या गोष्टी मोकळ्या मनाने बोलले. परंतु ब्रम्हदत्त राजाची गोष्ट निघाल्याबरोबर सर्वजण त्याजविषयी अत्यंत प्रेम दर्शवू लागले. राजाचे काही दोष असतील अशी शंका बोधिसत्वाने घेतली असता हा कुकल्पना करणारा गृहस्थ आहे, याच्याशी बोलण्यात अर्थ नाही असे म्हणून लोक उठून जात किंवा त्याची टवाळी तरी करीत. अर्थात आपल्या राज्याच्या सरहद्दीपर्यंत बोधिसत्वाला आपल्या अंगचा अवगुण दाखवणारा एकही मनुष्य सापडला नाही.

त्या काळी कोसल देशाचा राजा मल्लिक नावाने फार प्रसिद्ध होता. राजकारणात तो अत्यंत दक्ष होता. आपल्या आसपासचे लोक आपली स्तुती करतात, तेव्हा आपल्या

राष्ट्रातील लोकांची मने जाणण्याच्या उद्देशाने तोदेखील अज्ञात वेषाने कोसल राष्ट्रात फिरत होता. आपल्या राष्ट्राच्या सरहद्दीपर्यंत त्यालाही कोणी दोषदर्शक सापडला नाही. एका अरण्यमय प्रदेशात ओढ्याच्या काठी मल्लिक राजाच्या रथाची आणि बोधिसत्वाच्या रथाची समोरासमोर गाठ पडली. ओढ्यातून पलीकडे जाण्याचा रस्ता इतका अरुंद होता की, एकदम दोन रथांना जाणे शक्य नव्हते. तेव्हा मल्लिक राजाचा सारथी म्हणाला, " भो सारथी, तुझा रथ मागे घें म्हणजे मी माझा रथ पुढे हाकतो."

ब्रम्हदत्ताचा सारथी म्हणाला, " पहिल्याने तू तुझा रथ बाजूला घे आणि आम्हाला वाट दे."

त्यावर मल्लिकाचा सारथी संतापून म्हणाला, " तू मूर्ख दिसतोस, या रथामध्ये कोसलाधिपती मल्लिक राजांची स्वारी बसली आहे. तेव्हा पहिल्याने पुढे जाण्याचा हक्क माझ्या रथाचा आहे. "

ब्रम्हदत्ताचा सारथी म्हणाला, " पण माझ्या रथात त्रिभुवनविश्रुतकीर्ती श्रीब्रम्हदत्त महाराजांची स्वारी आहे. तेव्हा त्यांच्या रथाने पुढे व्हावे हे योग्य नव्हे काय?"

दोघा सारथ्यांचा बराच वेळ संवाद झाला. आपल्या धन्याची जाती, कुल, गोत्र, संपत्ती, वय वगैरे सर्व गोष्टींची त्यांनी तुलना करून पाहिली. त्या सर्व बाबतीत दोन्ही राजे समानच होते. तेव्हा ब्रम्हदत्त महाराजांचा सारथी म्हणाला, " आता आपण आपल्या मालकाच्या शीलाची तुलना करू. ज्याचे शील श्रेष्ठ दर्जाचे असेल, त्याने प्रथमत: जावे व इतरांनी त्याला वाट द्यावी. तेव्हा तू आता आपल्या मालकाचे शील काय ते सांग."

कोसल राजाचा सारथी म्हणाला, " आमच्या राजेसाहेबांचे शील ऐकून तुला मान खालीच घालावी लागणार आहे.; तथापि, ते ऐकण्याशी जर तुझी इच्छाच असली तर ऐकून घे. सांगतो. * आमचा राजा जबरदस्ताला जबरदस्तीने नरम करतो, मृदू ला मृदू उपायांनीच वश करतो ; साधूला साधुत्वानेच वळवतो व खलाला खोट्या मार्गानेच जिंकीत असतो. असा हा आमचा धनी आहे. तेव्हा रस्त्यातून दूर होऊन आमच्या रथाला वाट दे."

त्यावर ब्रम्हदत्ताचा सारथी म्हणाला, " वाहवा रे गुण ! आमच्या राष्ट्रात अशा गोष्टींना आम्ही गुण समजत नसतो. यांना जर गुण म्हणावे तर दोष कोणते? आमच्या राजाचे गुण याहून फारच निराळे आहेत. त्यातले काही ऐकण्याची तुझी इच्छाच असली तर ऐकून घे. ** आमचा राजा अक्रोधाने क्रोधाला जिंकतो; दुष्टाला साधुत्वाने जिंकतो; कृपणाला दानाने जिंकतो; व खोटे बोलणाऱ्याला सत्याने जिंकतो. असा हा राजा आहे. तेव्हा आमच्याच रथाला तू वाट दिली पाहिजेस."

हे त्या सारथ्याचे भाषण ऐकल्याबरोबर मल्लिक राजा रथातून खाली उतरला आणि बोधिसत्वाच्या जवळ जाऊन नमस्कार करून म्हणाला, " इतके दिवस माझे दोष दाखवून देणाऱ्या मनुष्याचा मी शोध करीत होतो; परंतु माझ्या राज्यात एकदेखील माणूस माझे दुर्गुण मला दाखवून देऊ शकला नाही. आज आपल्या आकस्मिक दर्शनाने माझे दोष मला कळून आले. तेव्हा आपण मला गुरूप्रमाणे वंद्य आहात."

बोधिसत्व म्हणाला, " हा तुमचा दोष नसून परिस्थितीचा दोष आहे. व्यवहारात सामान्य लोक ' जशास तसे' अशा आचरणाला महत्व देत असतात.  परंतु अशा वर्तनाने जगाच्या सुखात भर न पडता दु:ख वाढत जाईल, हे त्यांच्या लक्षात येत नाही. खरे म्हणाल तर दुष्टांना साधू उपायांनी जिंकावे या सारखा दुसरा राजधर्म नाही."

याप्रमाणे बोधीसत्वाने मल्लिकाला उपदेश करून वाराणसीचा रस्ता धरला. मल्लिक राजाही बोधिसत्वाला वंदन करून आपल्या राजधानीला गेला.

# नीचाशीं लढण्यापेक्षां पराजय बरा.

(सूकरजातक नं. १५३)

एका जन्मी बोधिसत्व सिंह होऊन अरण्यात राहत असे. त्या अरण्यात एका सरोवराच्या काठी आपल्या पर्णकुटिका बांधून पुष्कळ तपस्वी राहत असत आणि काही ग्रामसूकरही तेथे राहत असत. एके दिवशी बोधिसत्व हत्तीचे मांस यथेच्छ खाऊन त्या तळयावर पाणी पिण्यासाठी आला. जवळच एक लठ्ठ डुक्कर चरत होता. त्या लठ्ठ डुकरावर सिंहाची दृष्टी गेली व तो मनात म्हणाला," दुसरी काही शिकार सापडली नाही तर या डुकरावर आपल्याला निर्वाह करता येईल तेव्हा याला आपली चाहूल न दाखविता येथून निघून जावे हे बरे."

असा विचार करून सिंह पाणी पिऊन आड वाटेने हळूहळू दडत जाऊ लागला. पण त्याला डुकराने ओळखले, आणि मोठ्याने ओरडून तो डुक्कर म्हणाला, " काय रे सिंहा, असा भिऊन पळतोस कशाला? तू जसा चतुष्पाद आहेस, तसा मीही चतुष्पाद आहे. तेव्हा घाबरून पळून न जाता माझ्याशी चार हात कर व आपला पराक्रम दाखीव."

सिंह म्हणाला, " अरे डुकरा, आज मी तुझ्याशी युद्ध करू इच्छित नाही. आणखी एका आठवड्याने आपण येथे भेटू व त्या वेळी द्वंद्वयुद्ध करू."

डुकराला ही गोष्ट पसंत पडली. तो घरी जाऊन आपल्या जातभाईंना म्हणाला, " आज मी मोठा पराक्रम केला आहे. मला पाहून एक सिंह हळूच दडत पळून जात होता. त्याला मी आव्हान दिले. परंतु त्याची तयारी नसल्यामुळे त्याने एक आठवडा मागून घेतला आहे. आणखी एका आठवड्याने तो माझ्याशी लढाई करण्यास येणार आहे. सिंहाविषयी आपल्या जातीला उगाच बाऊ वाटत असतो. इतका जर सिंह बळकट असता, तर युद्धाची तयारी करण्यास त्याला एक आठवडा

का लागला असता? एवढी तयारी करून आला तरी मी त्याची अशी खोड जिरवतो की, त्याने या अरण्यात पुन्हा पाऊलदेखील टाकू नये. "

हे त्या डुकराचे बालिश भाषण ऐकून वृद्ध डुक्कर म्हणाले, " बाबारे, तुझी बडबड आता बंद कर. सिंहाने तुला आठवड्याची मुदत दिली हे तुझे भाग्य समज. हत्तीचे मांस खाऊन सिंह तृप्त झाला असेल आणि आठवडाभर पुरण्या इतके मांस शिल्लक असेल म्हणून तुला त्याने आठवड्याची मुदत दिली आहे. हत्तीचे गंडस्थळ फोडणाऱ्या सिंहापुढे तुझ्यासारख्या य:कश्चित प्राण्याचे काय चालणार आहे? पण तुझा हा मूर्खपणा तुलाच भोवणार आहे असे नाही तर त्याचा परिणाम आम्हा सर्वांना भोगावा लागेल. सिंह तुला मारीलच पण तेवढ्याने त्याची तृप्ती न होता तो आमचा सर्वांचा नाश करील."

हा हितोपदेश ऐकून तो लठ्ठ डुक्कर घाबरून गेला. हत्ती त्याने पाहिला होता. पण त्या हत्तीचे गंडस्थळ एवढासा सिंह फोडून टाकतो ही गोष्ट त्याला माहित नव्हती. आता वृद्ध डुकराच्या उपदेशाने त्याचे डोळे उघडले आणि त्याला शरण जाऊन तो म्हणाला, " मी हे धाड्साचे कृत्य केले खरे, परंतु यातून पार पडण्याचा उपाय कोणता? मी आजच येथून पळून जाऊ की काय?"

ते वृद्ध डुक्कर म्हणाले, " पळून जाण्याने या प्रश्नाचा निकाल लागणार नाही. सर्व डुकरे या आठवड्यात पोराबाळांना घेऊन दुसरीकडे जाऊ शकणार नाहीत आणि जरी गेले तरी त्यांना गाठून सिंह सर्वांचा फन्ना उडवून देईल. तेव्हा आता तू असे कर की, या ऋषींच्या शौचकुपात जाऊन लोळ आणि पुन्हा सर्व दिवस अंग वाळल्यावर दुसऱ्या दिवशी तसाच लोळून अंगाला विष्ठेची चांगली पुटे दे व ठरलेल्या दिवशी तळयाच्या काठी जाऊन वाऱ्याच्या उलट्या दिशेला उभा राहा. परंतु तेथे जाण्यापूर्वी दवाने आपले अंग ओले करण्यास विसरू नकोस. "

त्या तरूण डुकराने वृद्ध डुकराचा उपदेश मानला. दुसरा धंदा न करता सात दिवसपर्यंत शौचकुपात लोळून आठव्या दिवशी पहाटेस दवाने आपले अंग भिजवून ठरलेल्या ठिकाणी आपल्या अंगाचा वारा सिंहावर जाईल अशा बेताने तो उभा राहिला. डुकराचे मांस कसे असते याची रुची घेण्याची आज संधी मिळेल असा विचार करीत सिंह त्या ठिकाणी आला. पण डुकराच्या अंगाची अशी घाण सुटली होती की, त्याच्या आसपास जाणे मुळीच शक्य नव्हते. तो दूर अंतरावर उभा राहिला. त्याला पाहून शौर्याचा मोठा आव आणून डुक्कर म्हणाला, " काय रे इतका दूर का उभा राहतोस? असा जवळ ये म्हणजे एकदम युद्धाला सुरुवात करू."

सिंह म्हणाला, " बाबा रे, तू ही उत्तम युक्ती शोधून काढली आहेस. तुझ्या अंगाचा एवढा दुर्गंध सुटला आहे की, तुला पायानेदेखील शिवण्यास मी धजावणार नाही. मग तुझ्या अंगाचा चावा घेण्याची गोष्ट बाजूसच राहिली. आता मी पराजित झालो असे तू खुशाल म्हण. मी आपखुशीनेच तुला जय देतो. नीचाशी लढण्यापेक्षा पराजय पतकरलेला बरा."

असे म्हणून सिंह तेथून निघून गेला आणि हा डुक्कर बचावल्याबद्दल सर्व डुकरांना आनंद झाला. इतकेच नव्हे, तर सिंहाचा पराजय करण्याचे नवीन साधन त्यांच्या हाती आल्यामुळे त्यांना सिंहाचे भय वाटेनासे झाले.

## थोराची कृतज्ञता.

(गुणजातक नं. १५०)

एका जन्मी बोधिसत्व सिंह होऊन एका टेकडीवर गुहेत राहत असे. त्या गुहेच्या पायथ्याशी एक तळे होते. एके दिवशी एक मृग त्या तळयाच्या काठी गवत खात असताना सिंहाने पाहिला व टेकडीवरून खाली उतरून मोठ्या वेगाने त्याने त्या मृगावर झडप घातली. सिंहाची चाहूल ऐकल्याबरोबर मृगाने पळ काढला व त्यामुळे बोधिसत्वाची उडी चुकून तो तळयाच्या काठच्या चिखलात रुतला. सात दिवसपर्यंत तो तेथेच अडकून राहिला. त्या बाजूने एक कोल्हा पाणी पिण्यासाठी येत होता. सिंहाला पाहिल्याबरोबर तो पळू लागला. परंतु सिंह मोठयाने ओरडून म्हणाला, " बा कोल्ह्या, असा घाबरून पळून जाऊ नकोस. मी चिखलात रुतून दुःख भोगीत आहे. जर यातून पार पडण्याचा काही मार्ग असेल तर शोधून काढ."

कोल्हा म्हणाला, " कदाचित मला काही युक्ती सुचली असती परंतु तुम्हाला जीवदान देणे म्हणजे माझ्या जिवावरच संकट ओढवून घेण्यासारखे आहे. तेव्हा तुम्ही दुसऱ्या कोणाला तरी मदत करण्याला सांगा. घरी माझी बायका मुले वाट पाहत असतील. तेव्हा मला लवकर गेले पाहिजे."

बोधिसत्व म्हणाला, " बाबारे, तुझा मुद्दा खरा आहे. तथापि तुला मी सर्वथैव मित्राप्रमाणे वागवीन असे अभिवचन देतो. जर तू मला या संकटातून पार पाडलेस तर तुझे उपकार मी कसा विसरेन?"

कोल्ह्याने त्याच्या चारी पायांजवळचा चिखल उकरून काढला व तळयाच्या पाण्यापर्यंत वाट करून पाणी त्या खड्ड्यात शिरेल असे केले. तळयाचे पाणी आत शिरल्याबरोबर बोधिसत्वाच्या पायाखालचा चिखल मऊ झाला आणि त्याला अनायासे बाहेर पडता आले. त्या दिवसापासून सिंहाची आणि कोल्ह्याची फार मैत्री जडली. कोल्ह्याला दिल्यावाचून सिंह पकडलेल्या शिकारीचे मांस खात नसे. काही दिवसांनी तो कोल्ह्याला म्हणाला, " तू दूर राहत असल्यामुळे तुझी

भेट घेण्यास मला त्रास पडतो. जर तू माझ्या गुहेजवळ येऊन राहशील तर बरे होईल. मी तुला एखादी सोईस्कर जागा देईन."

कोल्हा म्हणाला, " पण मी विवाहित आहे. तेव्हा माझ्या बायकोची आणि माझी सोय कशी होईल?"

सिंह म्हणाला, " तुम्हा दोघांचीही व्यवस्था होण्यास अडचण होणार नाही. शिवाय मी शिकारीला गेल्यावर माझी बायको गुहेत एकटीच असते. तिला तुझ्या बायकोची मदत होईल व आपण सारे मोठया गुण्यागोविंदाने राहू."

सिंहाच्या सांगण्याप्रमाणे कोल्हा सहकुटुंब येऊन सिंहाच्या शेजारी एका लहानशा गुहेत राहिला. शिकार मारून आणल्यावर प्रथमत: सिंह एक वाटा घेऊन कोल्ह्याकडे जात असे व त्याची आणि त्याच्या बायकोची तृप्ती झाल्यावर मग राहिलेले मांस आपल्या स्त्रीला देऊन आपण खात असे. काही दिवसांनी कोल्हीला दोन पोरे झाली व सिंहिणीलाही दोन पोरे झाली. तेव्हापासून सिंहीण कोल्ह्याच्या कुटुंबाचा मत्सर करू लागली. आपल्या नवऱ्याने शिकार मारून आणावी व कोल्ह्याच्या कुटुंबाने यथेच्छ मांस खाऊन चैन करावी, हे तिला बिलकुल आवडेना या शिवाय बायकांचा स्वभाव फार संशयी असतो. त्यामुळे तिला असे वाटले की कदाचित सिंहाचे प्रेम त्या कोल्हीवर असावे. नाहीतर आपल्या मुलांना मांस देण्यापूर्वी त्याने ते तिच्या मुलांना दिले नसते. काही असो, त्या कोल्हीला तेथून हाकलून द्यावे असा बेत त्या सिंहिणीने केला व आपल्या पोरांना पाठवून तिच्या पोरांना त्रास देण्यास सुरुवात केली. कोल्ह्याला घेऊन सिंह शिकारीला गेल्याबरोबर इकडे सिंहाचे पोरगे कोल्ह्याच्या पोरांना भय दाखवीत असत. कोल्हीण सिंहिणीजवळ गाऱ्हाणे घेऊन येत असे. तेव्हा सिंहीण म्हणत असे, "येथे राहिली आहेस कशाला? माझी पोरे जर तुझ्या पोरांना त्रास देतात तर चालती हो येथून त्यांना घेऊन. त्यांच्या कागाळया घेऊन आलीस तर ते मला मुळीच खपणार नाही."

कोल्हीला हा ताप फारच असह्य झाला व तिने ती गोष्ट आपल्या नवऱ्याला कळविली. दुसऱ्या दिवशी कोल्हा सिंहाला म्हणाला, " महाराज, मी आपला आश्रित आहे.

आश्रितावर आश्रयदात्याचा सदोदित हक्क असतो., असा न्याय आहे. जर आपणाला माझे वास्तव्य येथे नको असेल तर आपण हक्कानेच मला येथून जाण्यास सांगा. म्हणजे माझ्या कुटुंबाला घेऊन मी ताबडतोब येतून निघून जातो. परंतु आपल्या मुलांकडून आणि कुटुंबाकडून माझ्या बायकामुलांना सतत त्रास होणे हा सरळ मार्ग नव्हे."

सिंहाला खरी गोष्ट काय होती हे मुळीच ठाऊक नव्हते. परंतु चौकशीअंती त्याला सर्व काही समजून आले. तेव्हा तो सिंहिणीला म्हणाला, " भद्रे, मागे एकदा सात दिवसपर्यंत मी या गुहेत परत आलो नव्हतो हे तुला आठवते काय?"

सिंहीण म्हणाली, " होय. मला आठवते. का की त्यावेळी स्वत:च शिकार करून निर्वाह करण्याचा प्रसंग माझ्यावर आला होता. मला असे वाटले की, आपण शिकारीच्या नादात कोठेतरी भरकटत गेला असाल."

"नाही भद्रे, मी भरकटलो नव्हतो. डोंगराखाली असलेल्या तळयाच्या काठी मी चिखलात रुतून राहिलो होतो. केवळ लाजेखातर ही गोष्ट मी तुला सांगितली नाही. त्या प्रसंगी या कोल्ह्याने मोठया युक्तीने मला त्या संकटातून पार पाडले. तेव्हापासून त्याची माझी मैत्री जडली. भद्रे! जरी आपला मित्र आपल्यापेक्षा दुर्बल असला तरी, जोपर्यंत तो मित्रधर्माने वागत आहे तोपर्यंत त्याची अवहेलना करता कामा नये; तोपर्यंत त्याला आपला बांधव, सखा किंवा मित्र असे म्हणण्यास हरकत नाही. जरी हा कोल्हा य:कश्चित प्राणी आहे तरी त्याने मला प्राणदान दिले आहे हे लक्षात ठेव आणि मनातील सर्व कुशंका सोडून दे. आपल्या मुलांप्रमाणे त्याच्याही मुलांवर प्रेम करीत जा व त्याच्या स्त्रीला आपल्या बहिणीप्रमाणे मानीत जा."

सिंहाचा उपदेश सिंहिणीने मोठ्या आदराने पाळला. असे सांगतात की, त्या सिंहाच्या आणि कोल्ह्याच्या कुटुंबाची मैत्री सात पिढ्यांपर्यंत अव्याहत चालली होती.

## कांट्यानें काढितात कांटा कीं.

(सुहनु- जातक नं. १५८)

एकदा आमचा बोधिसत्व वाराणसी राजाचा मुख्य प्रधान झाला होता. तो राजाची सर्व कामे पाहत असे. त्याला अश्वपरीक्षा फारच चांगली करता येत असल्यामुळे दुसऱ्या देशातून घोडे विकावयास आणले असता तोच त्यांची किंमत ठरवीत असे. राजा जरा धनलोभी होता. बोधीसत्वाने ठरवलेली योग्य किंमत त्याला आवडत नसे. एके दिवशी एक व्यापारी काही घोडे घेऊन वाराणसीला आला व राजेसाहेबांची भेट घेऊन ते घोडे विकत घेण्याची त्याने विनंती केली. राजाने बोधिसत्वाला न सांगता दुसऱ्या एका हांजी हांजी करणाऱ्या अमात्याला बोलावून त्या घोड्यांची किंमत करण्यास सांगितली आणि तो म्हणाला, " हे पहा, या घोड्यांची किंमत करण्यापूर्वी आमच्या पागेत महासोण नावाचा जो मोठा उनाड घोडा आहे त्याला त्या घोड्यांवर सोडून दे. लाथा वगैरे मारून त्याने त्या घोड्यांना दुर्बल केल्यावर मग त्यांची किंमत कर. अमात्य फारच आज्ञाधारक होता. त्याने महासोणाला त्या घोड्यांवर घातले आणि त्यांचे हाल करून मग राजाच्या इच्छेप्रमाणे अगदीच थोडी किंमत ठरवली. बिचारा व्यापारी चकीत होऊन गेला. पहिला चांगली किंमत ठरवणारा प्रधान जाऊन त्याच्या जागी हा भलताच माणूस कसा काय आला याचे त्याला फार फार आश्चर्य वाटले. परंतु विषाद मानण्यात काहीच अर्थ नव्हता. ठरलेली किंमत न घेता घोडे घेऊन काही फायदा झाला नसता. कारण त्या घोड्यांची इतर ठिकाणी जास्त किंमत आली असती असे नव्हते. म्हणून मिळालेले पैसे घेऊन तो बोधिसत्वापाशी गेला आणि शोकस्वराने म्हणाला, " महाराज, आपण योग्य किंमत देत असता, म्हणून इतक्या दुरून घोडे घेऊन आम्ही येथे आलो; परंतु या खेपेला भलत्याच माणसाने आमची फजिती करून टाकिली."

बोधिसत्व सर्व हकीगत ऐकून घेऊन म्हणाला, " तुम्ही विषाद न मानता परत स्वदेशी जाऊन दुसरा एखादा खोडसाळ घोडा मिळत असला तर पहा व त्याला घेऊन इकडे या. इकडे महासोणाला घोड्यांवर घालण्यात आल्याबरोबर तिकडे त्या खोडसाळ घोड्याला सोडून द्या म्हणजे मग काय गंमत होईल ती पाहू."

बोधिसत्वाच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या खेपेस तो व्यापारी सुहनु नावाचा एक भयंकर खोडसाळ घोडा बरोबर घेऊन आला. आणि आपल्या इतर घोड्यांना घेऊन राजाला

त्यांची किंमत ठवण्याची त्याने विनंती केली. वहिवाटीप्रमाणे महासोणाला त्या घोड्यांवर सोडण्यात आले तेव्हा त्या व्यापाऱ्याने आपल्या सुहनुला सोडून दिले. त्या दोघांची गाठ पडल्याबरोबर ते परस्परांचे अंग चाटू लागले. जणू काय ते सख्खे भाऊच आहेत असे लोकांना वाटले. ते पाहून राजा चकीत झाला आणि बोधिसत्वाला म्हणाला, " मित्रा, हा आमचा घोडा इतका द्वाड असून त्याचे या आगंतुक घोड्याशी सख्य कसे जमले?"

बोधिसत्व म्हणाला," महाराज हा नवीन घोडा आपल्या महासोणापेक्षाही अधिक द्वाड आहे. तेव्हा त्या दोघांची मैत्री जमली यात मोठे नवल नाही. या व्यापाऱ्याने काट्यानेच काटा काढण्याची ही युक्ती योजिली आहे.महाराज, धनलोभाला वश होणे आपल्यासारख्या राज्यपदारूढ पुरुषाला शोभत नाही. अशा रितीने दूर देशातून येणाऱ्या व्यापाऱ्यांची जर आपण हानी केली, तर ते आपल्या देशात येणार नाहीत, आणि त्यामुळे आपल्या देशात पैदा न होणाऱ्या वस्तूंच्या किमती भलतीकडेच जातील. म्हणून आपल्या फायद्यासाठीदेखील सत्याने आणि न्यायाने वागणे हे आम्हा सर्वांस हितकारक आहे."

बोधिसत्वाचा उपदेश ऐकून राजाने धनलोभ सोडून दिला आणि तेव्हापासून तो न्यायाने वागू लागला.

## तरुणाचा उत्साह.

(सुसीम जातक नं. १६३)

प्राचीनकाळी वाराणसी नगरीत सुसीम नावाचा राजा राज्य करीत होता. आमचा बोधिसत्व त्या राजाच्या पुरोहिताच्या स्त्रीच्या पोटी जन्मास आला. तो वयात येण्यापूर्वीच पुरोहित मरण पावला. बोधिसत्वाचे अध्ययन संपले नव्हते. बाप वारला तेव्हा त्याचे वय सुमारे सोळा सतरा वर्षांचे होते. इतक्यात हत्तींचा सण आला.

हत्तींचा सण म्हणजे त्या दिवशी हत्तींना घालण्यासाठी सरदार मानकरी वगैरे लोक नाना तऱ्हेचे अलंकार आणीत असत. या शिवाय पुष्कळ वस्तू गोळा करून त्यांनी हत्तींची पूजा करण्यात येत असे. आणि पूजाविधी आटोपल्यावर ते सर्व साहित्य पुरोहिताला मिळे. पुरोहितालाच सर्व द्रव्य मिळावे ही गोष्ट वाराणसीतील ब्राम्हणांना आवडत नसे. परंतु वहिवाटी विरुद्ध जाण्याचे त्यांच्यात सामर्थ्य नव्हते. पुरोहित गेल्यावर राजगृही जमून ते राजाला म्हणाले," महाराज, यंदाच्या हत्तींच्या सणातील सर्व दक्षिणा आम्हा सर्वांना मिळाली पाहिजे. का की पुरोहिताचा मुलगा तरूण असून तो सर्व वेदांमधे आणि हस्तीसूत्रात निष्णात नाही. तेव्हा जुनी वहिवाट मोडून सर्व ब्राम्हणांना या दक्षिणेचे वाटेकरी करावे, अशी आमची विनंती आहे."

राजाला ही गोष्ट पसंत पडली व पुढे येणाऱ्या हत्तींच्या सणातील दक्षिणा सर्व ब्राम्हणांस मिळावी, असा त्याने निकाल दिला. ही गोष्ट बोधिसत्वाच्या आईला समजली तेव्हा अत्यंत खिन्न होऊन तिच्या डोळयातून अश्रूधारा वाहू लागल्या. बोधिसत्व अध्ययन करून घरी येऊन पाहतो तो आपली आई शोकमय झालेली त्याला दिसली. तेव्हा तो आईला म्हणाला, " तुझ्या शोकाचे कारण काय ते मला सांग. तू जर शोक सोडून दिला नाहीस तर मी अन्नग्रहण करणार नाही."

आई म्हणाली, " बाळा, आज माझ्या कानी एक वाईट बातमी आल्यामुळे मी उद्विग्न झाले आहे. तू तरूण आहेस अशी संधी साधून गावातील ब्राम्हणांनी आपला कुलपरंपरेचा हक्क

नष्ट करण्याचा खटाटोप चालविला आहे आणि आपल्या राजानेही त्यांच्या प्रयत्नांस आपल्या आज्ञेने यश दिले आहे. हत्तीच्या सणातील सर्व वस्त्रालंकार तुझ्या वाडवडिलांना मिळत असत. परंतु आता तू लहान आहेस व तुझे अध्ययन पुरे झाले नाही, या सबबीवर आपल्या कुलाचा हक्क काढून घेऊन तो वाराणसीतील सर्व ब्राम्हणांना देण्यात येणार आहे. आपल्याला द्रव्यप्राप्ती होणार नाही याजबद्दल मला मुळीच वाईट वाटत नाही. आपल्या घरी पुष्कळ धन आहे आणि इतके धन येऊन तरी ब्राम्हणाला काय करायचे आहे? तथापि, संधी साधून इतर ब्राम्हण आपल्या कुलाचा हक्क बुडवू पाहत आहेत याचेच मला राहून राहून वाईट वाटत आहे."

हे आपल्या मातोश्रीचे भाषण ऐकून बोधिसत्वाचे प्रसुप्त तेज एकदम जागृत झाले. तो म्हणाला, " आई, आजपर्यंत मी मोठया उत्साहाने मुळीच अध्ययन केले नाही. आपल्या घरी पुष्कळ संपत्ती आहे. आणखी पुष्कळ अध्ययन करून काय करावयाचे अशा वेडगळ समजुतीने माझे चित्त अध्ययनापेक्षा क्रीडेकडे जास्त लागले; पण आता तुला दु:ख झालेले पाहून मला संवेग उत्पन्न झाला आहे. आणि  हतीचा सण येण्यापूर्वी माझे अध्ययन पुरे करण्याचा मी दृढनिश्चय केला आहे. आता तू मला एवढेच सांग की, सर्व वेदांमधे आणि शास्त्रांमधे पारंगत असा गुरू कोठे सापडेल?"

आई म्हणाली, " बाळा, आपल्या या वाराणसीत सर्व ब्राम्हण अर्धकच्चे आहेत. उत्तम पंडीत एका तक्षशिला नगरीतच सापडतात. तुला जर सर्व शास्त्रांत पारंगतता संपादावयाची आहे तर तेथे जाऊन गुरुगृही वास केला पाहिजे."

त्याच दिवशी बोधीसत्वाने वाटखर्ची बरोबर घेऊन वाराणसीतून प्रयाण केले व जितक्या लवकर तक्षशिलेला जाणे शक्य होते तितक्या लवकर तो तेथे जाऊन पोहोचला. तेथे एका प्रसिद्ध आचार्याच्या घरी जाऊन त्याने अध्ययनास सुरुवात केली. परंतु तेथील मंद अभ्यासक्रमाने हत्तीचा सण येण्यापूर्वी घरी पोहोचणे शक्य नव्हते म्हणून तो आचार्यांना म्हणाला, " गुरूजी, या रोजच्या अभ्यासक्रमाने माझे काम भागणार नाही. मला निकडीच्या कामासाठी अध्ययन  पुरे करून लवकर घरी गेले पाहिजे."

त्या आचार्याने बोधिसत्वाला निराळे शिकवून त्याच्या अध्यापनाची फार काळजी घेतली. बोधिसत्वानेही आपल्या अंगच्या हुशारीने आचार्याला संतुष्ट करून तीन वेदांचे व हस्तीसूत्रांचे अध्ययन हत्तीचा सण येण्यापूर्वीच पुरे केले आणि त्या सणाच्या पूर्वदिवशी तो आपल्या घरी येऊन पोहोचला. हत्तीच्या सणाची सर्व तयारी झालीच होती. दुसऱ्या दिवशी हस्तीशाळेत ब्राम्हण समुदाय जमून होमहवनाला सुरुवात झाली. राजाही आपल्या अमात्यांसह तेथे आला. इतक्यात बोधिसत्व तेथे येऊन राजाला म्हणाला, " महाराज, आमच्या कुलातील कोणीच ब्राम्हण येथे हजर नसताना आजच्या सणाची तयारी चालली आहे, हे काय?"

राजा म्हणाला, बाबारे, तुझ्या कुलात तूच काय तो शिल्लक राहिला आहेस आणि तुझे अध्ययन अपुरे असल्यामुळे यंदाची दक्षिणा शहरातील सर्व ब्राम्हणांना वाटून देण्यात येणार आहे. म्हणून तुझी या ठिकाणी जरूर पडली नाही."

बोधिसत्व म्हणाला, " महाराज, माझे अध्ययन पुरे झाले नाही ही गोष्ट आपणाला कोणी सांगितली?" राजा म्हणाला," हे सर्व ब्राम्हण सांगत आहेत."

बोधिसत्व म्हणाला, " तर मग या ब्राम्हणांनी पुढे येऊन मला प्रश्न विचारावे किंवा मजबरोबर वेदमंत्र म्हणण्यास आरंभ करावा. आणि जर त्यातील एक जणदेखील मला जिंकू शकला तर आमच्या कुलपरंपरेत चालत आलेली वहिवाट मोडून सर्व दक्षिणा या ब्राम्हणांस द्यावी. पण जर ते हरले, तर त्यांना माझ्याविषयी विनाकारण गैरसमजूत उत्पन्न केल्याबद्दल योग्य शासन व्हावे."

वेदांविषयी आणि हस्तिसूत्रांविषयी त्यातील एकदेखील ब्राम्हण बोधिसत्वाला प्रश्न करण्यास धजला नाही. तेव्हा बोधिसत्वानेच वेदमंत्र आणि हस्तीसूत्र त्या सभेत म्हणून दाखविले. तेव्हा ते सर्व ब्राम्हण या तरुणाची बुद्धी पाहून चकीत होऊन गेले. आणि राजाला भलतीच गोष्ट सांगितल्याबद्दल त्यांनी त्याची क्षमा मागितली. राजाने पूर्वीची वहिवाट कायम करून सर्व दक्षिणा बोधिसत्वाला देवविली. आपल्या कुलाची परंपरा एकुलत्या एका तरूण मुलाने राखल्याबद्दल बोधिसत्वाच्या आईला फार आनंद झाला.

## नीच बोलावयाला लागला, तर थोर मौन धरतात.

(दद्दरजातक नं. १७२)

एका जन्मी बोधिसत्व सिंहांचा राजा होऊन हिमालयावरील एका भव्य गुहेत राहात असे. एके दिवशी काही कारणाने आजूबाजूचे सर्व सिंह त्याच्या गुहेच्या अंगणात गोळा झाले होते. तेथे जमल्यावर वहिवाटीप्रमाणे त्या सर्वांनी गर्जना करण्यास सुरुवात केली. त्या टेकडीच्या जवळच दुसऱ्या एका टेकडीवर एक कोल्हा राहत होता. त्याला सिंहांची गर्जना आवडली नाही. आणि त्यांची तोंडे बंद करण्यासाठी त्याने कोल्हेकुईला सुरुवात केली. तो शब्द कानी पडताच सर्व सिंह चपापून जागच्याजागी चूप बसले. सिंहांना एकाएकी स्वस्थ बसलेले पाहून सिंहराजाचा पुत्र आपल्या पित्यास म्हणाला, " बाबा, हे सगळे सिंह भीतीने गांगरून गेले आहेत असे वाटते. पण असा हा कोणता प्राणी बरे की, ज्याचा शब्द ऐकल्याबरोबर ही दशा व्हावी?"

बोधिसत्व म्हणाला, " बाळ, तुझी अगदीच उलटी समजूत झाली आहे. हा मोठा प्राणी नसून नीच कोल्हा आहे; आणि त्याच्या कोल्हेकुईबरोबर सिंहगर्जना करणे लज्जास्पद असल्यामुळे माझे ज्ञातीबांधव चूप राहिले आहेत. नीचाबरोबर बोलण्यापेक्षा मौनव्रत चांगले, हे तू लक्षात ठेव."

# हलकटाला आश्रय देऊं नये.

(मक्कटजातक नं. १७३)

एकदा आमचा बोधिसत्व काशीदेशात एका खेडेगावी जन्मला होता. वेदाध्ययन वगैरे झाल्यावर त्याने विवाह केला. परंतु दु:खाची गोष्ट ही की, एक मुलगा जन्मल्याबरोबर त्याची बायको मरण पावली. तो मुलगा थोडा चालू बोलू लागल्यावर त्याला घेऊन बोधिसत्व हिमालयावर जाऊन राहिला. तेथे त्याने एक सुंदर पर्णशाला बांधली व अग्नीहोत्राची उपासना करून तो कालक्रमणा करू लागला. एके दिवशी हिमालयावर गारांचा मोठा पाऊस पडला. त्यामुळे एक वानर थंडीने गारठला आणि कोठेतरी आगीजवळ बसण्यास सापडते आहे की काय याच्या शोधास लागला. बोधिसत्वाच्या आश्रमात होमकुंड जळत असलेले पाहून त्याला मोठे समाधान वाटले पण दरवाजावर बोधिसत्वाचा मुलगा बसला असल्यामुळे मर्कटाला एकदम आत घुसण्यास भीती वाटली. तेव्हा त्याने एक नवी युक्ती शोधून काढली. जवळच्या एका पर्णकुटीत एक तापस राहत होता. थोड्या दिवसांमागे तो मरण पावल्यामुळे त्याची वल्कले वगैरे तापसवेषाला लागणारे सर्व पदार्थ तेथेच पडून राहिले होते. ती वल्कले परिधान करून आणि कमंडलू वगैरे हातात घेऊन तो मर्कट बोधिसत्वाच्या आश्रमापाशी आला. त्याला पाहून बोधिसत्वाचा पुत्र धावत धावत बोधिसत्वापाशी गेला आणि म्हणाला, " बाबा, एक ठेंगू तापसकुमार आपल्या आश्रमापाशी आला आहे. त्याचा आदरसत्कार करून आपण त्याला ठेवून घेऊ. आपण फलमूलांसाठी अरण्यात गेल्यावर मी येथे एकटाच असतो. त्याच्या संगतीने मला बरे वाटेल आणि आम्ही दोघेही बरोबर अध्ययन करू."

बोधिसत्व आश्रमाबाहेर येऊन पाहतो तो तापस वेषधारी मर्कटमहाराजांची स्वारी त्याला दिसली आणि तो म्हणाला, " मुला हाच ना तो तुझा तापसकुमार?"

मुलगा म्हणाला, " हो बाबा, हाच तो तापसकुमार. याची ओळख करून घेण्यासाठी मी उत्सुक झालो आहे."

बोधिसत्व म्हणाला, " बाबारे, जरा दम धर. हा तापसकुमार नसून, तापसवेषधारी नीच मर्कट आहे. सुशील ब्राम्हणाचे किंवा तापसाचे तोंड यांच्यासारखे विचित्र नसते. याला जर आपण आश्रय दिला तर आपल्या पर्णकुटीची तो नासघूस करून टाकील. तेव्हा याला येथूनच घालवून द्यावे हे बरे."

असे बोलून बोधिसत्वाने अग्निकुंडातील एक कोलीत त्या माकडावर फेकले. तेव्हा वल्कले आणि कमंडलू टाकून देऊन माकड खरे स्वरूप प्रकट करून पळून गेले.

## खळाला मदत केल्याबद्दल प्रायश्चित.

(दूभियमक्कटजातक नं. १७४)

दुसऱ्या एका जन्मी बोधिसत्व काशी राष्ट्रात ब्राम्हण कुलात जन्मला होता. मोठा झाल्यावर तो काही कामानिमित्त दूरच्या एका गावी जाण्यास निघाला. वाटेत एक मोठे अरण्य होते. त्या अरण्यात एकच फार खोल विहीर होती. विहिरीजवळ जनावरांना पाणी पिण्यासाठी एक डोणी ठेविली होती आणि वाटसरू लोक पुण्य संपादण्यासाठी विहिरीचे पाणी काढून त्या डोणीत भरून ठेवीत असत. परंतु दोन तीन दिवस त्या मार्गाने कोणी वाटसरू न गेल्यामुळे डोणी ठणठणीत कोरडी पडली होती . बोधिसत्व त्या विहिरीजवळ जाऊन हातपाय धुऊन व पाणी पिऊन उभा राहिला. इतक्यात तहानेने तळमळणारे एक माकड त्याच्या पाहण्यात आले. बोधिसत्वाला त्या माकडाची फार कीव आली, व आपल्या तांब्याने विहिरीतून पाणी काढून त्याने ती डोणी भरली. माकड पाणी पिऊन तृप्त जाहले व झाडावर बसून वेडे वाकडे तोंड करून बोधिसत्वाकडे पाहू लागले, तेव्हा बोधिसत्व त्याला म्हणाला, " बा मर्कटा, तुझ्यावर उपकार करण्यासाठी मी इतके कष्ट सहन केले. या खोल विहिरीतून पाणी काढून ते मी तुला पाजले आणि आता तू अशा प्रकारे माझे उपकार फेडतो आहेस काय?"

बोधिसत्व ज्या झाडाखाली बसला होता, त्यावर उडी मारून माकड म्हणाले, " वेडया ब्राम्हणा, आमच्या जातीत वेडी वाकडी तोंडे न करणारा असा कोणी तुला आढळला आहे काय? पण एवढयाने तुला संतोष होत नसला तर आणखी दुसरे काही काही करून तुझे उपकार फेडण्यास मी तयार आहे."

या नीचाबरोबर संवाद करण्यात अर्थ नाही हे जाणून बोधिसत्व तेथून जाण्यासाठी उठून उभा राहिला. इतक्यात माकडाने झाडावरून त्याच्या उघड्या डोक्यावर देहधर्म केला. बोधिसत्व म्हणाला," नीचाला मदत केल्याबद्दल मला योग्य प्रायश्चित्त मिळाले." असे बोलून त्या विहिरीवर जाऊन बोधिसत्वाने स्नान केले आणि तेथून निघून गेला.

# माकडाचा दांभिकपणा.

(आदिच्चुपट्ठानजातक नं. १७५)

आमचा बोधिसत्व एका जन्मी तापस होऊन मोठया तापस परिवारासह हिमालयावर राहत असे. वर्षाकाळी आपल्या परिवारासह तो जवळपासच्या एका मोठया गावाजवळ येत असे व वर्षाकाल संपल्यावर पुन्हा हिमालयावर जात असे. एका पावसाळयात एका गावाजवळ तो आपल्या परिवारासह भाविक लोकांनीबांधून दिलेल्या पर्णशालेत राहत होता. सकाळच्या प्रहरी तापसगण भिक्षेला गेल्यावर एक माकड त्या पर्णकुटिकेत शिरून फार नासधूस करीत असे. अग्नीकुंडात राख टाकावी, पाण्याचा घडा उपडा करावा, कमंडलू फोडून टाकावे व सरते शेवटी देहधर्म करून तेथून निघून जावे, अशा रितीने त्याने त्या ऋषीगणांना फार त्रास दिला. चातुर्मास्य संपल्यावर बोधिसत्व आपल्या परिवारासह हिमालयावर जाण्यास निघाला. तेव्हा ग्रामवासी लोकांनी मोठा उत्सव करून तापसगणांना महादान दिले. ते पाहून त्या माकडाला फार मत्सर वाटला. तो मनाशी म्हणाला, " हे जंगलात राहणारे तपस्वी आहेत. त्यांच्यात आणि माझ्यात काहीच अंतर नसताना लोक यांची पूजा करतात व मी लोकांच्या दाराशी गेलो असता दगड मारून मला घालवून देतात. मी जसा फलमूलांवर राहतो, तसेच हे तापस लोकही फलमूलांवर राहतात. परंतु त्यांच्यासारखे अग्नीहोत्रादिकांचे स्तोम मी माजवले नसल्याने मला त्यांच्यासारखा मान मिळत नसावा."

असा विचार करून हळूच पर्णशालेतून आगीचे कोलीत चोरून नेऊन त्याने उघड्या मैदानात पंचाग्नी साधनाचे व्रत सुरू केले. चारी दिशांना चार अग्नी पेटवून अंगाला राख फासून तो त्या अग्नीच्या मध्यभागी सूर्याकडे टक लावून पाहत बसला.तापसांची पूजा करण्यासाठी जे लोक येत असत ते आश्चर्यचकीत होऊन म्हणत, " काय हो, सर्व प्राण्यांमधे साधूपुरूष आढळतातच. या वानराचे तप पाहा, हा य:कश्चित प्राणी असूनही याने पंचाग्नी साधनाचे कडकडीत व्रत चालविले आहे."

या प्रमाणे मर्कटाची स्तुती बोधिसत्वाच्या कानापर्यंत गेली. तेव्हा तो त्या लोकांना म्हणाला, " बाबांनो, या माकडाची तपश्चर्या पाहून भुलून जाऊ नका. याचे चरित्र कसे आहे ते तुम्हास ठाऊक नाही. रोजच्या रोज अग्नीशाळेची नासधूस करून याने आमचे पुष्कळ कमंडलू फोडले आहेत. आता आम्ही जाण्याच्या सुमाराला तो तपस्वी बनू पाहत आहे."

बोधिसत्वाचे हे भाषण ऐकून ते लोक आपल्या काठ्या वगैरे उगारून त्या माकडावर धावले तेव्हा त्याचे धैर्य गलित होऊन ते तेथून दूर पळून गेले.

# वानराचें दूरदर्शित्व.

(तिण्डुकजातक नं. १७७)

एका जन्मी बोधिसत्व वानरयोनीत जन्म पावून वयात आल्यावर एका वानर समुदायाचा राजा झाला होता. तो अरण्यात राहात असे. त्याच्याजवळच एक टेंभुर्णीचा मोठा भव्य वृक्ष होता. त्या वृक्षाच्या आसपास वर्षातून काही दिवस एक गावच वसत असे तर काही दिवस तेथे कोणीही राहात नसत. जेव्हा तेथे लोकांची वस्ती नसे, तेव्हा बोधिसत्व आपल्या परिवारासह तेथे जाऊन त्या वृक्षाची फळे यथेच्छ खात असे. परंतु एका वर्षी अशी गोष्ट घडली की, त्या वृक्षाला फळे येण्याला आणि लोकांची वसाहत होण्याला एकच गाठ पडली. तेव्हा बोधिसत्वाला तेथे जाण्याचे सोडून देणे भाग पडले. पण त्याच्या कळपातील वानरांना ही गोष्ट आवडली नाही. ते म्हणाले, " आम्ही प्रतिवर्षी त्या झाडाची गोड फळे खात आलो आहोत. आता त्याच्या आसपास माणसांची वस्ती झाली म्हणून फळे खाण्याचे सोडून देणे हा नामर्दपणा आहे. लोक

माध्यान्ह समयी निजत असतात, त्यावेळी हळूच जाऊन आपण फळे खाऊन घेऊ." बोधिसत्वाने वानरगणांचे मन वळवण्याचा पुष्कळ खटाटोप केला. परंतु बहुमतापुढे त्याचे काही चालले नाही. तेव्हा त्याने तेथे जाण्याचा ठराव केला आणि सेनक नावाच्या आपल्या भाच्याला एकांती बोलावून आणून तो म्हणाला, " बा सेनका, तूदेखील इतर वानरांसारखा फळलोभी आहेस काय? "

सेनक म्हणाला, " आपल्या आज्ञेपुढे मला दुसऱ्या कोणत्याही वस्तूची चाड वाटत नाही. आपण जर सांगाल तर मी केवळ पाणी पिऊनदेखील राहीन."

यावर बोधिसत्व म्हणाला, " मी या गणांचा राजा असल्यामुळे मला यांच्याबरोबर गेलेच पाहिजे. जर का मी मागे राहिलो तर मला भ्याड म्हणून हे माझी निंदा करतील आणि माझ्याविषयीची त्यांची आदरबुद्धी पार नष्ट होईल. म्हणून आज आम्ही फळे खावयास जाऊ तेव्हा तू मागे राहा आणि जर आम्ही संकटात सापडलो असे दिसले तर मी सांगतो त्या उपायाने आम्हाला त्या संकटातून सोडव."

बोधिसत्वाची आज्ञा सेनकाने मान्य केली. आपण संकटात सापडलो तर कोणती युक्ती योजावी या संबंधाने बोधिसत्वाने त्याला नीटपणे सर्व काही सांगून ठेविले आणि वानरगणांना घेऊन दुपारच्या प्रहरी तो त्या वृक्षावर फळे खात बसला. उन्हाळा फार असल्यामुळे सर्व लोक आपापल्या झोपडीत विश्रांती घेत बसले होते किंवा काही जण झोपी गेले होते. परंतु काही कारणानिमित्त त्यातील एक जण झोपडीच्या बाहेर आला, पाहतो तो टेंभुर्णीचे झाड माकडांनी भरून गेलेले. त्याने सर्व लोकांना उठवून जागे केले आणि सर्वांनी शस्त्रास्त्रे घेऊन त्या वृक्षाला वेढा दिला. वानरगणांची पाचावर धारण बसली. ते गयावया करत बोधिसत्वाला म्हणाले, " महाराज, आपला सल्ला आम्ही मानला असता तर या संकटात सापडलो नसतो. आम्हीच अशा कचाट्यात सापडलो असे नाही तर आपणालादेखील आम्ही दु:खात पाडले आहे."

बोधिसत्व म्हणाला, " आता झालेल्या गोष्टीबद्दल खेद करण्यात अर्थ नाही. तुम्ही धीर धरा. माझा भाचा सेनक मागे राहिला आहे. तो आपल्याला या संकटातून मुक्त करील."

बोधिसत्वाने धीर दिला नसता, तर ते माकड गर्भगळीत होऊन खाली पडले असते आणि प्राणाला मुकले असते.

इकडे सेनक त्या गावाबाहेर आपल्या जातभाईंची काय वाट लागते ते पाहत बसला होता. सर्व मर्कट समुदायाला सशस्त्र मनुष्यांनी वेढलेले पाहून त्याने मामाने शिकविलेली युक्ती अमलात आणली. झोपडीत शिरून तेथे जळत असलेले कोलीत घेऊन त्याने दोन चार झोपड्या पेटवून दिल्या. आग जिकडेतिकडे फैलावत चालल्यामुळे गावातील बायकामुलांत एकाच हाहा:कार उडाला. माकडांना घेरा घालून राहिलेले लोक आपली शस्त्रास्त्रे घेऊन आगीच्या दिशेने, ती विझविण्यासाठी मदत करण्यासाठी धावत सुटले. तेव्हा बोधिसत्व .काही एक इजा न होता आपल्या समुदायासह तेथून पळून गेला. सर्व मर्कटगणांनी त्याच्या दूरदर्शित्वाची फार तारीफ केली. बोधिसत्वानेही सेनकाने आपली आज्ञा पाळली म्हणून त्याचा योग्य गौरव केला.

## जन्मभूमीचा फाजील अभिमान.

(कच्छपजातक नं. १७८)

बोधिसत्व एकदा काशीराष्ट्रात कुंभाराच्या कुलात जन्मून थोर झाल्यावर मातीची भांडी करून आपला निर्वाह करीत असे. त्याच्या गावाजवळ एक मोठे सरोवर होते. ते उथळ असल्यामुळे त्यात उन्हाळयात फार पाणी राहत नसे. पावसाळयात नदीला पूर आल्यावर ते तुडुंब भरून जाई. परंतु पूर ओसरून गेल्यावर त्यातले पाणी हळूहळू कमी होत जाई व कधीकधी ते अगदी ठणठणीत कोरडे पडत असे. पुराच्या वेळी त्या सरोवरात पुष्कळ मासे येत असत. परंतु ज्या वर्षी ते तळे कोरडे पडण्याचा संभव असे त्या वर्षी ते मासे पूर ओसरण्याच्या आधीच नदीला जाऊन मिळत. एका वर्षी पाऊस थोडा पडल्यामुळे सरोवरात पाणी राहाण्याचा संभव दिसेना. तेव्हा सर्व मत्स्य, कच्छप तेथून निघून नदीच्या प्रवाहात गेले. परंतु एक कासव तेथेच राहिले. त्याचे मित्र त्याला म्हणाले, " बाबारे, सर्व मत्स्यजाती तलाव कोरडा पडण्याचे चिन्ह पाहून येथून निघून जात आहेत. मग तुझा एकट्याचा राहाण्याचा हट्ट का?"

ते कासव म्हणाले, " तुम्हाला तुमच्या जन्मभूमीची मुळीच काळजी नाही. उगाच कुशंका मनामधे आणून आपल्या जन्मभूमीचा त्याग करण्याला तुम्हाला लाज वाटत नाही? मी माझ्या जन्मभूमीची सेवा करीत येथेच राहाण्याचा निश्चय केला आहे. "

त्याचे मित्र आणि आप्तेष्ट त्याचे मन वळवू शकले नाहीत. ते त्याला एकट्यालाच तेथे सोडून चालते झाले. दूरदर्शी माशांनी भविष्य केल्याप्रमाणे त्या वर्षी त्या तळयाचे पाणी पार आटून गेले. बोधिसत्व त्याच तळयातील चिखल नेऊन भांडी करीत असे. कासवाला पाणी न मिळाल्यामुळे ते चिखलात रुतून राहिले. बोधिसत्व चिखल उकरीत असता कुदळीचा धक्का लागून त्याचे कवच फुटले आणि ते वर येऊन तळमळत पडले. बोधिसत्वाला त्याची ही दीन दशा पाहून त्याची अत्यंत कीव आली आणि तो म्हणाला, " बा कासवा, तुझा मी मोठा अपराध केला आहे. तू

चिखलात आहेस हे न जाणता त्याच्यावर मी घाव घातला आणि तुझे कवच फोडून टाकले याबद्दल तू मला क्षमा कर."

कासव म्हणाले, " बा कुंभारा, तुझा यात काहीच अपराध नाही. एवीतेवी भक्ष्य न मिळाल्यामुळे मी या चिखलात प्राणाला मुकलोच असतो. तू माझे मरण जवळ आणलेस एवढेच काय ते." आपल्या जन्मभूमीचा फाजील अभिमान धरून जे तिला चिकटून राहातात त्यांची हीच गत होते. माझ्या या विपत्तीपासून लोकांनी शिकण्यासारखा धडा घ्यावा म्हणजे जेथे आपले पोट भरून सुखाने वास करता येईल तीच आपली खरी जन्मभूमी समजली पाहिजे. उगाच फाजील अभिमान धरून जातस्थली मरून जाणे यात मुळीच पुरुषार्थ नाही. "

हे उद्गार काढून कासवाने तेथेच प्राण सोडला.बोधिसत्वाने  घरी येऊन ती गोष्ट आपल्या ज्ञाती बांधवांस सांगितली.

# खरें बंधुप्रेम.

(असदिसजातक नं. १७९)

वाराणसीच्या राजाला दोन पुत्र होते. थोरल्याचे नाव असदृशकुमार आणि धाकट्याचे ब्रम्हदत्तकुमार असे होते. त्यात असदृशकुमार हा आमचा बोधिसत्व होता. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने तक्षशिलेला जाऊन एका प्रसिद्ध आचार्यांच्या हाताखाली तीन वेदांचे आणि अठरा शास्त्रांचे अध्ययन केले आणि तो परत वाराणसीला आला. त्याचा पिता मरतेवेळी असदृशकुमाराला राज्य देऊन ब्रम्हदत्ताला युवराज करावे असे प्रधानमंडळाला सांगून मरण पावला. त्याचे उत्तरकार्य आटोपल्यावर प्रधानमंडळाने बोधिसत्वाला राज्याभिषेक करण्याची सर्व व्यवस्था केली. परंतु बोधिसत्व म्हणाला, " मला राज्यकारभाराचा भार नको आहे.शास्त्राध्ययन आणि धनुर्विद्या यातच मी आनंद मानीत असतो. माझा धाकटा भाऊ सर्व तऱ्हेने राज्यकारभार वाहाण्याला योग्य आहे आणि राजा होण्याची त्याला फार इच्छाही आहे. तेव्हा त्यालाच राज्यपदावर बसवावे अशी मी सर्वांना विनंती करतो."

सर्व प्रधानमंडळाने आणि वाराणसीवासी प्रजाजनांनी बोधिसत्वाला राज्यपद स्वीकारण्याविषयी फार आग्रह केला.परंतु त्यांचा इलाज चालला नाही. शेवटी बोधिसत्वाच्या इच्छेप्रमाणे ब्रम्हदत्तालाच त्यांनी अभिषेक केला. ब्रम्हदत्त आपल्या वडील भावाच्या सल्ल्यानेच राज्यकारभार पाहात असे.  पण हळूहळू राज्यपदाच्या धुंदीत तो सापडला. हांजीहांजी करणाऱ्या लबाड लोकांची त्याच्या भोवती मालिका जमली. आपल्या धन्याला संतुष्ट करण्यासाठी ज्याच्या त्याच्या खोट्यानाट्या चुगल्या करण्याचा धंदा त्यांनी सुरू केला. एकाने तर राजाला असे सांगितले की, वडील भाऊ असदृशकुमार राजाला मारून राज्य बळकावण्याचा कट करीत आहे. झाले ! ही गोष्ट निघाल्याबरोबर दुसरा म्हणाला, " मला या संबंधाने मागेच बातमी लागली होती. परंतु म्हटले उगाच महाराजांचे आपल्या वडील बंधूविषयी मन कलुषित का करा? म्हणून चूप राहिलो."

त्यावर तिसरा म्हणाला, " अहो पण तुमचे हे करणे अगदीच अयोग्य झाले. राजेसाहेब अन्नदाते, त्यांच्या जिवावर जर कोणी उठला -  मग तो वडील भाऊ असो किंवा आजा

असो-  आम्ही त्याच्या कटाची माहिती महाराजांना ताबडतोब दिली पाहिजे. परंतु तुम्ही इतके दिवस मौन धरून बसलात याला काय म्हणावे?"

अशा रितीने त्या लुच्चा लोकांनी राजाचे मन बिघडवून टाकले आणि त्यामुळे एके दिवशी राजाने आपल्या भावास पकडून कैद करण्याचा हुकूम दिला. बोधिसत्वाचा एक अत्यंत जिवलग मित्र प्रधानमंडळात होता. त्याने ही बातमी त्याला कळवली. अशा लबाड लोकांच्या हाती लागण्यापेक्षा येथून पलायन केलेले बरे, असा विचार करून बोधिसत्व रात्रीच्यारात्री वाराणसीतून पळून गेला. तो दूरच्या एका मांडलिक राजापाशी जाऊन नोकरीस राहिला. त्या राजाने बोधिसत्वाचे धनुर्विद्या कौशल्य पाहून त्याचा फार मोठा सन्मान केला आणि त्याला सदोदित आपल्याजवळ ठेवून घेतले.

एके दिवशी राजा उद्यानक्रीडेसाठी आपल्या आम्रवनात गेला होता. तेथे आंब्याच्या झाडाच्या अग्रशाखेवर एक आंबा पिकला होता. तो काठीने किंवा दगडाने पाडणे शक्य नव्हते का की, ते झाड फार उंच होते आणि त्याच्या शाखांतून हा पिकलेला आंबा तेवढा दिसत होता. तेव्हा राजाने सर्व धनुर्धारकांना बाण मारून तो आंबा खाली पाडण्यास सांगितले. परंतु त्यातील एक जणही नीट शरसंधान करून आंबा पाडू शकला नाही. नंतर बोधिसत्वाला हे कामसांगितले. त्याने अचूक बाण मारून आंबा आणि बाण दोन्ही वरच्यावर झेलून धरले. हे आश्चर्य पाहून राजाने बोधिसत्वाचा फार गौरव केला आणि त्यामुळे त्याची कीर्ती देशोदेशी पसरली.

इकडे असदृशकुमार वाराणसी सोडून दुसरीकडे गेला असे जाणून आसपासचे सात लहानलहान राजे एकवटून वाराणसीवर चाल करून आले. वाराणसीत बोधिसत्वासारखा शूर शिपाई आणि दूरदर्शी मुत्सद्दी नाही, तेव्हा आपण क्षणार्धात ब्रम्हदत्ताला शरण आणू आणि त्याच्याकडून भरपूर खंडणी घेऊ असे त्यांना वाटले होते. परंतु वाराणसीचा कोट फारच बळकट असल्यामुळे त्यांच्या मनोरथाप्रमाणे एकदम ते शहर त्यांना जिंकता आले नाही. तेव्हा शहराला वेढा घालून ते तेथेच राहिले. ब्रम्हदत्तावर हे मोठेच संकट कोसळले. आता त्याला वडील बंधूची आठवण झाली. तो आपल्या हांजीहांजी करणाऱ्या नोकरांना म्हणाला, " तुम्ही खोटेनाटे सांगून माझ्या वडील बंधूला येथून घालवून दिलेत. परंतु तो जर येथे असता तर आज आमचे या संकटापासून रक्षण करता. आतादेखील आपण त्याजपाशी एक गुप्त हेर पाठवू. आमच्यावर आलेले संकट त्याला समजले तर आमचे अपराध पोटी घालून तो आमच्या मदतीला धावत आल्यावाचून राहाणार नाही.

त्याचे बंधूप्रेम इतके अलौकिक आहे की, माझ्यासारख्या कृतघ्न भावाच्या दुर्वर्तनाने ते मलीन होणार नाही."

ब्रम्हदत्ताने गुप्त हेर पाठवून वाराणसीच्या वेढ्याचे वर्तमान कळवल्याबरोबर बोधिसत्व आपल्या धन्याचे काही निवडक योद्धे बरोबर घेऊन वाराणसीला आला. ' मी असदृशकुमार आपल्या भावाला मदत करण्यासाठी आलो आहे' अशा तऱ्हेचा मजकूर लिहून ती पत्रे बाणाला बांधून शत्रूसेनेच्या मध्यभागी पाडली. बोधिसत्वाचे नाव ऐकल्याबरोबर त्या सात राजांची सेना फार गडबडून गेली. आणि जो तो जिकडे वाट सापडेल तिकडे पळू लागला. एका तासाच्या आत वाराणसी शहराचा वेढा उठला व मोठ्या जयजयकारात बोधिसत्वाने शहरात प्रवेश केला. ब्रम्हदत्ताने पुढे येऊन त्याचे पाय घट्ट धरले आणि केलेल्या अपराधाची क्षमा मागितली. तेव्हा बोधिसत्व म्हणाला, " तुझ्या दुष्ट सोबत्यांनी तुझे मन बिघडविले असले तरी तू माझा भाऊ आहेस. आणि म्हणूनच तुझ्यावरचे माझे प्रेम कधीही कमी झाले नाही. तू लुच्चा लोकांच्या नादाला लागलास हे पाहून मात्र  मला फार वाईट वाटले. पण आता तुला वाईट संगतीचे फळ कोणते हे पक्के समजून चुकले आहे व या पुढे तुझ्या हातून पुन्हा अयोग्य गोष्ट होणार नाही अशी मला आशा आहे."

ब्रम्हदत्ताने आपल्या वडील भावाला मोठ्या आग्रहाने आपल्याजवळ ठेवून घेतले आणि तेव्हापासून त्याच्या सदुपदेशाबाहेर आजन्म पाऊल टाकले नाही.

## लंगडा गुरू.

(गिरिदंतजातक नं. १८४)

एके काळी वाराणसीत साम नावाचा राजा राज्य करीत होता आणि आमचा बोधिसत्व त्याचा प्रधान होता. राजाला अत्यंत उत्तम घोडा आणून नजर करण्यात आला. तो जरी उत्तम जातीचा होता तरी चांगला शिकलेला नव्हता म्हणून गिरीदंत नावाच्या अश्वशिक्षकाच्या स्वाधीन त्याला करण्यात आले. गिरीदंत लंगडा होता, तो घोड्याचा लगाम हातात धरून पुढेपुढे चालला असता लंगडत लंगडत चालत असे. काही दिवसांनी घोडाही लंगडू लागला. घोड्याच्या पायाला रोग झाला असेल असे वाटून सर्व अश्ववैद्यांना बोलावून परीक्षा करविली. परंतु परीक्षेअंती घोड्याला कोणताच रोग नाही असे समजले. तेव्हा राजा मोठ्या काळजीत पडला. इतका चांगला घोडा आपणास मिळाला असून तो थोडक्याच दिवसात लंगडा होऊन बसावा याचे राजाला फार वाईट वाटले. ते पाहून बोधिसत्व म्हणाला, " महाराज, आपण काळजी करू नका. मी या संबंधाने नीट विचार करून घोड्याच्या रोगाचे कारण शोधून काढतो."

त्या दिवसापासून बोधिसत्वाने घोड्याच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली. गिरीदंत जेव्हा लगाम हातात धरून पुढे जाऊ लागला, तेव्हा त्याच्या मागोमाग घोडादेखील लंगडत चालू लागला. ते पाहिल्याबरोबर बोधिसत्वाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. तो राजाजवळ जाऊन म्हणाला, " महाराज घोड्याला कोणताही रोग नाही. लंगडे गुरुजी आपल्याला चालण्याचे कौशल्य शिकवीत आहेत असे वाटून घोडाही लंगडत आहे. दुसरा एखादा अवयवसंपन्न शिक्षक मिळाला असता हा घोडा लंगडण्याची दुष्ट सवय सोडून देऊन नीट चालू लागेल."

राजाने बोधिसत्वाच्या सल्ल्याप्रमाणे दुसरा शिक्षक ठेविला. तो जातीवंत घोडा आपल्या शिक्षकाची चाल पाहून आपणही नीट चालू लागला.

# सहवासाचें फळ.

(दधिवाहन जातक नं. १८६)

एकदा वाराणसीत दधिवाहन नावाचा राजा राज्य करीत होता आणि आमचा बोधिसत्व त्याचा अमात्य होता. एके दिवशी मगरांना दूर काढण्यासाठी गंगेत जाळी सोडून त्याच्या आत दधिवाहन राजा जलक्रीडा करीत असता हिमालयावरून एक सर्वोत्कृष्ट आंब्याचे फळ वाहात येऊन जाळयात अडकले. राजपुरुषांनी ते फळ काढून घेऊन राजाला अर्पण केले. राजाला ते फळ इतके आवडले की, देवलोकीचा अमृतरस त्यापुढे तुच्छ असावा असे त्याला वाटले. त्याने ती कोय मोठया समारंभाने आपल्या उद्यानात लावली आणि दुधाच्या पाण्याने तिला वाढविली. काही दिवसांनी आंब्याचे झाड फोफावून तीन वर्षांच्या आत त्याला फळे येऊ लागली. बीजाप्रमाणेच ती फळेही अत्यंत मधुर होती. राजाने त्या झाडाचा फारच सत्कार चालविला. त्याला साखरेचे खत घालीत असत आणि दुधाने शिंपीत असत. भोवतालचे कुंपण मखमलीचे होते व त्याभोवती रोज अत्तराचे दिवे जाळण्यात येत असत.

दधिवाहन फार मत्सरी होता. आपल्या आंब्यासारखे आंबे दुसऱ्या राजाच्या उद्यानात तयार होऊ नयेत यासाठी तो फार खबरदारी घेत असे. भेटीसाठी आंबे पाठविताना एका विषारी काट्याने कोयीला भोक पाडून पाठवित असे. राजे लोक आंब्याचा आस्वाद घेऊन फार संतुष्ट होत आणि कोय पेरून आंब्याचे झाड उगविण्याची  वाट पाहात. परंतु त्यांची आशा कधीही सफळ झाली नाही. मत्सरामुळे दधिवाहन आंब्याच्या कोयीला भोक पाडून पाठवतो ही गोष्ट एका राजाला समजली. तेव्हा आपल्या हुशार माळयाला बोलावून आणून तो म्हणाला, " दधिवाहनाला आपल्या आंब्याची फार घमेंड आहे. तू तेथे जाऊन त्याचा तो आंबा बिघडून जाईल अशी युक्ती करशील काय?"

माळी म्हणाला, " महाराज, आपली आज्ञा असेल तर दोन चार वर्षांचे आत दधिवाहन राजाचा आंबा बिघडेल असा उपाय मला करता येईल. पण येथून मला चार  वर्षांची रजा मिळाली पाहिजे, "

त्या राजाने माळयाला मोठया आनंदाने रजा दिली. माळी वाराणसीला येऊन दधिवाहनाजवळ नोकरीस राहिला. भलत्याच वेळी फुले फुलवून दाखवून आणि भलत्याच ऋतूत झाडांना फळे येतील असे उपाय करून त्याने दधिवाहनाला प्रसन्न करून घेतले. तेव्हा दधिवाहनाने जुन्या माळयाला काढून टाकून मुख्य उद्यानाची सर्व व्यवस्था या नवीन माळयाच्या हातात दिली. त्याने हळूहळू त्या सरस आंब्याच्या आजूबाजूला निंबाची आणि दुसरी कडू जातीची झाडे लावून दिली आणि त्यांची चांगली जोपासना केली. दोन चार वर्षात ती झाडे भराभर वाढली आणि त्यामुळे आंब्याचे फळ कडू झाले. ते पाहून माळी तेथून पळून गेला. एके दिवशी दधिवाहन राजा आपल्या अमात्यांसह उद्यानात इकडे तिकडे फिरत असताना आंब्याच्या झाडाजवळ आला आणि आपल्या लोकांकडून एक पिकलेला आंबा त्याने झाडावरून काढून घेतला, पण तोंडात घातल्याबरोबर तो त्याला इतका कडू लागला की, त्याचा रस त्याने तेव्हाच थुंकून टाकला आणि तो बोधिसत्वाला म्हणाला, " मित्रा, या आंब्याचे असे परिवर्तन का झाले? साखरेचे खत, दुधाने शिंपणे, गंधाच्या दिव्याची पूजा इत्यादी सर्व उपचार चालू असता आंब्याचे फळ निंबाच्या पाल्यासारखे कडू का व्हावे?"

बोधिसत्वाने  निरीक्षण करून पाहिले; आणि तो राजाला म्हणाला, " महाराज, या आंब्याच्या झाडाला निंबाच्या आणि दुसऱ्या जातीच्या झाडांनी वेढले आहे हे तुम्ही पाहातच आहात. त्यांच्या शाखा या झाडाच्या शाखेत मिसळल्या आहेत, त्यांची मुळे याच्या मुळांशी संबद्ध झाली आहेत आणि त्यामुळे या आंब्याच्या झाडातील मधुरता जाऊन त्याच्या अंगी कडूपणा आला आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे वाईट सहवासाचे हे फळ आहे."  *

राजाने आजूबाजूची कडू जातीची झाडे तोडून टाकण्याचा हुकूम केला. ती तोडून त्यांची मुळे खणून काढण्यात आली. तेव्हा त्या आंब्याच्या झाडाला पूर्ववत मधुर फळे येऊ लागली.

* मूळ गाथा -

पुचिमंदपरिवारो अंबो ते दधिवाहन ।

मूलम मूलेन संसठ्ठम साखा साखानिसेवरे ।

असतम सन्निवासेन तेनम्बो कटुकप्फलो ।।

राजानें आजुबाजूचीं कडू जातीचीं झाडें तोडून टाकण्यास हुकूम केला. तीं तोडून त्याचीं मुळें खणून काढण्यांत आलीं. तेव्हां त्या आंब्याच्या झाडाला पूर्ववत् मधुर फळें येऊं लागलीं.

# मूर्खाला मौन शोभतें.

(सीहचम्मजातक नं. १८९)

एकदा बोधिसत्व एका गावात शेतकरी होऊन राहात असे. त्या समयी एक फेरीवाला एका गाढवावर आपले सामान घालून दारोदारी त्या सामानाची विक्री करून आपला निर्वाह करीत असे. गाढवाला चारा वगैरे देण्यासाठी पैसे खर्च होऊ नयेत म्हणून त्याने एक युक्ती योजिली होती. कोठून तरी एक सिंहाचे चामडे पैदा करून त्याने तो आपल्या गाढवाला आच्छादित असे आणि लोकांच्या शेतात सोडून देत असे. गाढव यथेच्छ खाऊन परत आपल्या धन्याजवळ येत असे. हा प्रकार पुष्कळ दिवस चालला होता. एके दिवशी तो फेरीवाला त्या गाढवाला घेऊन बोधिसत्व राहात होता त्या गावी आला. गावाच्या वेशीजवळ गाढवावरील सामान उतरून घेऊन त्याला सिंहाच्या चामड्याने झाकून त्याने एका जवाच्या शेतात सोडून दिले आणि तो आपल्या जेवणाच्या तयारीस लागला. इकडे त्या शेताचा राखणदार सिंह आला असे वाटून घाबरून गेला आणि धावत जाऊन त्याने इतर शेतकऱ्यांना ही खबर दिली. तेव्हा बोधिसत्व म्हणाला, " आपण शेतात जाऊन सिंह कसा असतो ते तरी पाहू. घाबरण्याचे काही कारण नाही. दूर अंतरावरून वाद्ये, शंख वगैरे वाजविल्यावर तो पळून जाईल. कदाचित आपल्यावर चाल करून आलाच तर आपण दांडक्यांनी त्याला बडवून काढू."

बोधिसत्वाला पुढारी करून सर्व गावकरी त्या शेताजवळ गेले आणि वाद्ये वाजवून त्यांनी एकच घोष केला व मोठमोठ्याने आरोळया ठोकल्या. ते गाढव हा घोष ऐकून घाबरले आणि जातीस्वभावाला अनुसरून ओरडू लागले. तेव्हा बोधिसत्व जमलेल्या लोकांना म्हणाला, "  अहो, ही सिंहाची किंवा  व्याघ्राची आरोळी नव्हे. सिंहाच्या चामड्याखाली हा हलकट गाढव ओरडत आहे. "

तेव्हा त्या शेतकऱ्यांनी त्याच्यावर हल्ला करून त्याचे ते कातडे काढून घेतले आणि त्याला बेदम मार दिला. ते गाढव मरणोन्मुख होऊन तेथेच पडले. पुष्कळवेळपर्यंत गाढवाची वाट पाहून त्याचा मालक त्याच्या शोधार्थ गेला. तेव्हा त्याला त्याचे गाढव मरणाच्या वाटेला लागलेले आढळले. ती त्याची दशा पाहून फेरीवाला म्हणाला, " बा गाढवा,  या सिंहाच्या चामड्याखाली तू पुष्कळ दिवस  लोकांची शेते खाल्ली असतीस, परंतु एका ओरडण्याने तू आपल्यावर हे मरण ओढवून घेतलेस."

फेरीवाल्याचे हे भाषण संपते न संपते तो गाढवाने प्राण सोडला.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

## आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान